

घरचा स्वाद,
घरची शुध्दता...
शुद्ध खा.. स्वस्थ रहा
नवल
शुध्द घी
म्हशीचे व गायीचे साजुक तुप
मे. नवलमल दौलतराम, बॉम्बेलॉज खाली, आग्रा रोड,धुळे
फोन : (02562) 238661 email : navalgheedhule@gmail.com


# आपला महाराष्ट्र


मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२२४ ■ सोमवार १८ मे २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26



बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108


## वादळापुर्वीच्या शांततेची सोशल मिडीयावर पोस्ट करत ट्रम्प याच्याकडून पुन्हा ईराणवर हल्ला करण्याचा संदेश

**वॉशिंग्टन, दि. १७ : जागतिक पातळीवर आजची स्थिती म्हणजे वादळापुर्वीची शांतता, अशी आहे. कारण, अमेरिका पुन्हा ईराणवर हल्ला करण्याची शक्यता आहे. कारण, रविवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडिया खात्यांवर एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यामुळे इराणसोबत पुन्हा युद्धाची ठिणगी पडण्याची भीती निर्माण झाली आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ट्रम्प यांनी एक छायाचित्र पोस्ट केले आहे. ज्यामध्ये ते समुद्रात एका जहाजावर, एका लष्करी कमांडरच्या सोबतीने उभे असल्याचे दिसत आहेत. या छायाचित्रासोबत ट्रम्प यांनी लिहिले आहे की, ही वादळापूर्वीची शांतता होती. त्यांच्या या पोस्टचा अर्थ विविध प्रकारे लावला जात आहे. यापुर्वी २८ फेब्रुवारीस अमेरिका-इस्त्राईलने ईराणवर हल्ला केला होता. त्यानंतर ८ एप्रिलला दोन्ही देशांनी हल्ला थांबवला होता. पण, त्यांच्यात अंतिम समझोता होण्याचे प्रयत्न पूर्णतः सफल झालेले नाहीत.**




या छायाचित्रात डोनाल्ड ट्रम्प एका युद्धनौकेच्या डेकवर (सपाट पृष्ठभागावर) उभे असल्याचे दिसत आहे. त्यांनी डोक्यावर टोपी परिधान केली आहे. पार्श्वभूमीवर समुद्रात एखादे वादळ घोंघावत असल्याचे दृश्य दिसत आहे. त्यांच्या मागे, इराणचा ध्वज फडकवणारे एक जहाजही नजरेस पडत आहे. परिणामी, ट्रम्प यांच्या या पोस्टमुळे अमेरिका आणि इस्त्रायल इराणविरुद्ध(पान ४ वर)

## नीट पेपरफुटीवर गांधींचे सरकारसाठी तीन प्रश्न

नवी दिल्ली, दि. १७ : लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी नीट पेपरफुटीवरून केंद्र सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे. वारंवार परीक्षेचे पेपर का फुटत आहेत? असा प्रश्न राहुल गांधींनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना विचारला आहे. हे सगळं होत असताना अद्याप शिक्षणमंत्र्यांना बडतर्फ का करण्यात आले नाही, असेही राहुल गांधी म्हणाले. राहुल गांधी सातत्याने नीट पेपरफुटीचा मुद्दा उपस्थित करत आहेत. त्यांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करून केंद्र सरकारच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

राहुल गांधी यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री (पान २ वर)

## पंतप्रधानांकडून सफाई कामगारांचा होतो सन्मान मंत्र्यांकडून स्वच्छतागृह चालकांच्या पोटावर पाय

**नंदुरबार, दि.१७ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने राज्यातील सर्व बस स्थानकावरील प्रसाधनगृह व स्वच्छतागृहांची मान्यता रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. यावर राज्यातील मेहतर समाजात अन्याय झाल्याची भावना व्यक्त होत असून राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री यांना निवेदन पाठविण्यात आले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत स्वच्छ अभियानात महत्त्वाची भूमिका निभावणाऱ्या मेहतर समाज आणि सफाई कामगारांचा**



**पाय धुवून सन्मान केला होता. याउलट राज्यातील युती शासनाचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तूघलकी निर्णय घेऊन योजना स्वतःच्या घशात घालण्याचा प्रयतक सुरू आहे. यावर नंदुरबारसह संपूर्ण महाराष्ट्रातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.**

याबाबत सविस्तर वृत्त असे की, राज्य परिवहन महामंडळातर्फे राज्यातील सर्व बस स्थानकांवर स्वच्छतागृहे तेथील स्थानिक संस्थांना देखभाली साठी करार तत्त्वावर देण्यात आले आहेत. सन २०४० पर्यंत या करारांची मुदत असताना अचानक परिवहन मंत्री प्रताप सरनाईक (पान ४ वर)

## बनावट परवान्यावर खैर लाकडाची वाहतूक वन विभागाने अठ्ठावीस लाखांचा मुद्देमाल केला जप्त

**नवापूर, दि.१७ प्रतिनिधी- नवापूर तालुक्यातील कोंडाईबारी घाट परिसरात वनविभागाने मोठी कारवाई करत बनावट परवान्याच्या आधारे सुरू असलेली खैर लाकडाची वाहतूक उघडकीस आणली. या कारवाईत तब्बल अठ्ठावीस लाख पंचवीस हजार एकशे चोवीस किमतीचा खैर लाकूड माल आणि ट्रक जप्त करण्यात आला.**



दि. १५ मे २०२६ रोजी सहाय्यक वनसंरक्षक, नंदुरबार प्रादेशिक व वन्यजीव यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार कोंडाईबारी घाटातील वनउपज तपासणी नाका चौकीवर संशयित ट्रक क्रमांक जीजे १७/एक्सएक्स-९९५५ थांबवून तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ट्रकमध्ये मोठ्या प्रमाणात खैर लाकूड आढळून आले.

वाहतूक कागदपत्रांची चौकशी केली असता चालकाने तेलंगणा राज्य येथील परवानगीपत्र सादर केले. मात्र संबंधित ऑनलाइन पडताळणी करताना (पान ४ वर)

## विवाहात महिलेची सोनपोत लंपास

धुळे, दि.१७- गोंदूर शिवारातील लॉन्स मध्ये विवाह समारंभात गर्दीचा फायदा घेत चोरट्याने महिलेच्या गळ्यातील पन्नास हजारांची सोन्याची पोत लंपास केल्याची घटना घडली आहे. साई लक्ष्मी लॉन्स गोंदुर येथे १३ मेस दुपारी लग्न समारंभासाठी निर्मलाबाई सुभाष वाघ (वय ५५) आलेल्या होत्या. अज्ञात व्यक्तीने लग्न मंडपातुन गर्दीचा फायदा घेत त्यांचे गळ्यातुन सोन्याची पोत काढून घेतली. पन्नास हजार रुपये सोनपोतची किंमत आहे. याप्रकरणी पश्चिम देवपुर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. सहाय्यक उपनिरीक्षक के. डी. खंडीकर तपास करीत आहेत.

## अवधानच्या धनदाई नगरात चोरी सोन्याच्या दागिन्यांसह रोकड लंपास

**धुळे, दि.१७- धुळे शहरानजीक असलेल्या अवधान गावातील धनदाई नगर परिसरात धाडसी घरफोडीची घटना उघडकीस आली असून, अज्ञात चोरट्यांनी सुमारे एक तोळे सोन्याचे दागिने व पन्नास हजार रुपये रोख रक्कम लंपास केली आहे. ही घटना आज सकाळी निदर्शनास आली.**

अवधान येथील धनदाई नगरात राहणारे प्रल्हाद वाघ व त्यांचे कुटुंबीय हे उकाड्यामुळे रात्री घराच्या धाब्यावर झोपले होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. चोरट्यांनी घरातील कपाट फोडून पाच ग्रॅमची टोंगळ, पाच ग्रॅमची सोन्याची अंगठी असे मिळून सुमारे एक तोळे सोन्याचे दागिने तसेच दोन दिवसांपूर्वीच



लागलेल्या भिशीचे पन्नास हजार रुपये रोख रक्कम चोरून नेली.

आज सकाळी प्रल्हाद वाघ व त्यांचे कुटुंबीय घरात आले असता दरवाजाचे कुलूप तुटलेले व दरवाजा उघडा दिसून आला. त्यांनी तातडीने मोहाडी पोलिसांना घटनेची माहिती (पान ४ वर)

## अज्ञात वाहनाची धडक दुचाकीस्वार जागीच ठार

नंदुरबार, दि.१७(प्रतिनिधी)- भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने ब्रेक दाबल्यामुळे मागून येणारी दुचाकी धडकल्याने अपघातात एक जण जागीच ठार झाल्याची घटना अक्कलकुवा येथे घडली. याप्रकरणी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अक्कलकुवा तालुक्यातील मांडवीआंबा येथील सुरेश अमरसिंग तडवी (वय ४३) हे दुचाकीने अंकलेश्वर-बऱ्हाणपूर महामार्गाने जात होते. यावेळी अक्कलकुवा ते सोरापाडा रस्त्या दरम्यान वरखेडी नदीपूलावर पुढे धावणाऱ्या अज्ञात वाहन चालकाने अचानक ब्रेक (पान ४ वर)




## निंबोणी कोकणपाड्यातील कार्यकर्त्यांचा डॉ.मोरेंच्या साक्षीने राष्ट्रवादी पक्षात प्रवेश

**नंदूरबार, दि.१७- निंबोणी कोकणीपाडा येथील असंख्य नागरिकांनी आज जाहीरपणे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विचार आणि ध्येयधोरणांवर विश्वास ठेवून या सर्व सहकाऱ्यांनी हा निर्णय घेतला आहे.**

यាप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नंदुरबार जिल्हाध्यक्ष डॉ.अभिजीत मोरे, जिल्हासरचिटणीस मधुकर पाटील, नाना निकम, अल्तापभाई शहादा तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या सामाजिक कार्यकर्त्या आदिवासी समाजाच्या आदिवासी नेत्या मालती वळवी (पान ४ वर)

## बहुचर्चित नार-पार-गिरणानदी जोड प्रकल्पाचा कार्यारंभ आदेश जारी; उत्तर महाराष्ट्राचा पाणी प्रश्न मार्गी लागणार

**नाशिक, दि.१७- नाशिक आणि जळगाव जिल्ह्यासाठी लाईफलाइन ठरणाऱ्या बहुचर्चित नार-पार-गिरणा नदी जोड प्रकल्पाचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला असून प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील ४११६.१० कोटी रुपयांच्या कामाचा कार्यारंभ आदेश नुकताच प्रदान करण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून पश्चिमेकडे वाहणाऱ्या नद्यांचे १०.६४ टीएमसी पाणी पुर्वेकडील गिरणा खोऱ्यात वळविण्यात येणार आहे. मेसर्स मेघा**



**इंजिनिअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड आणि मेसर्स आयसीसी इन्फ्राटेक प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्यांना हे काम मिळाले आहे. या कामासाठी माजी संरक्षणराज्य मंत्री डॉ. सुभाष भामरे यांनी सातत्याने पाठपुरावा केला.**

उत्तर महाराष्ट्रातील गिरणा, मोसम, बोरी (पान ४ वर)

## वलवाडीला विविध विकास कामांचा खा.डॉ. शोभा बच्छावांच्या हस्ते शुभारंभ

**धुळे, दि.१७- वलवाडी परिसरातील गोवर्धन नगर व परिसरात काल धुळे लोकसभा मतदारसंघाच्या खासदार डॉ. शोभा बच्छाव यांच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन व उद्घाटन करण्यात आले.**

परिसरातील शिवसेनेच्या राज्य उपनेते तथा महाराष्ट्र टीचर्स असोसिएशन संघटनेच्या राज्याध्यक्ष शुभांगी पाटील यांच्या प्रयत्नातून खा.डॉ.शोभा बच्छाव यांच्या खासदार निधीतून कॉलनीतील अंतर्गत सिमेंट काँक्रीट रस्ते व मंदिरासाठी बोअर वेल मंजूर करण्यात आले होते. व या रस्ते कामाचे भूमिपूजन व बोअरवेल चे उद्घाटन आज धुळे लोकसभा मतदारसंघाच्या खासदार डॉ. शोभा बच्छाव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख



अतिथी म्हणून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ. दिनेश बच्छाव, शिवसेनेच्या राज्य उपनेते शुभांगी पाटील, शिंदे, गोवर्धन नगर परिसरातील ज्येष्ठ नागरिक चिंचोले, तोरवणे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

याप्रसंगी शिवसेनेच्या राज्य उपनेते शुभांगी पाटील यांनी आपल्या मनोगतात सांगितले की सदरचा चावरा हायस्कूल जवळील परिसर हा खूप वर्षापासून दुर्लक्षित असून आतापर्यंत सदर कॉलनीत एकदाही रस्ता (पान ४ वर)

## इंधन दरवाढीच्या निषेधार्थ शिवसेना उबाठाचा मोर्चा

धुळे, दि.१७- केंद्र शासनाने पेट्रोल, डिझेल, व्यावसायीक गॅसच्या दरात वाढ केल्याच्या निषेधार्थ शहरातून शिवसेना उबाठाच्या पदाधिकाऱ्यांनी मोर्चा काढला.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अच्छे दिन आयेंगेच्या भूलथापा देवून सत्ता मिळवली. निवडणुकांच्या काळात महागाई, इंधन दरवाढ होणार नसल्याचे सांगितले. परंतु निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर लगेच महागाई वाढली. पेट्रोल, डिझेल, गॅसच्या दरात मोठी वाढ करण्यात आली.भाजपाकडून जनतेची लूट केली आहे. केंद्राने डोके ठिकाणावर ठेवावे अन्यथा जनता डोके फोडल्याशिवाय राहणार नाही. असे मत यावेळी संपर्कप्रमुख अशोक धात्रक यांनी मोर्चा प्रसंगी (पान ४ वर)

## सुशिनाल्यातील अतिक्रमणधारकांचे पुनर्वसन करा- काँगीचे मुजफ्फर हुसेन

**धुळे, दि.१७- शहरातील सुशिनाल्यावरील चाळीस ते पन्नास वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांना अचानक नोटीस बजावून घरे तोडून त्यांना उघड्यावर आणण्यात आले. शासन निर्णयान्वये अतिक्रमीत धारकांचे जागा नियमानुकूल करण्यास किंवा अतिक्रमणधारकांना तात्काळ पुनर्वसन होण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी. या मागणीचे निवेदन माजी नगरसेवक तथा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष मुजफ्फर हुसेन दोस्त महंमद यांनी मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.सुनेत्रा पवार, महसुलमंत्री ना.चंद्रकांत बावनकुळे यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून दिले आहे.**

निवेदनात नमुद केले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार २०११ पावेतोचे संपूर्ण अतिक्रमीत घरे हे नियमित करण्याचे आदेश असतांना संबंधित नागरिकांना उघड्यावर संसार थाटावा लागतो आहे. सुशिनाला लगत अतिक्रमणाबाबत न्यायालयात कामकाज होवून दि.५ मे रोजी अतिक्रमण हटविण्यास आठ दिवसांची तात्पुरती स्थगिती देवून दिवाणी न्यायायलात दाद मागण्यास सांगितले. तरी देखील दि.६ मे २०२६ रोजी पाटबंधारे उपविभागाच्या अधिकाऱ्यांनी न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करून बळाचा वापर करून कारवाई केली.

शहरात पांझरा नदी किनारी पुर क्षेत्र परिसरात अनेक बांधकाम आहेत. सुशिनाला व्यतिरिक्त नाले आहेत. (पान ४ वर)

## व्यावसायिकाला मारहाण अडीच लाख लुटले

धुळे, दि.१७- पुणे येथून धुळे तालुक्यातील अजनाळे येथे शेती व्यवहाराच्या उद्देशाने आलेल्या व्यापारीसह तिघांना मारहाण केली. त्यांच्याकडील अडीच लाखांची रोकड चौघांनी लुटून नेली. याप्रकरणी चारही जणांविरुद्ध धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

पुणे येथील हॉटेल व्यवसायिक आशिष मधुकर नेहे, हडपसर पुणे दोन मित्रांसह अजनाळे येथे आले होते. शेत जमीन खरेदीच्या उद्देशाने आले होते. अजनाळे येथील एका हॉटेल जवळ शुक्रवारी दुपारी दोनच्या सुमारास थांबले, संबंधितांशी व्यवहार संदर्भात चर्चा सुरू होती, त्याचवेळी चौघांनी शिवीगाळ दमदाटी करीत मारहाण केली. व्यावसायिक(पान ४ वर)

## सत्कर्म करून पुण्य खात्यात जमा करा पू.विराग ज्योतीश्रीजी महाराजांचे मत

**शिंदखेडा, दि.१७- एक ना एक दिवस हे जग सोडून प्रत्येकाला जायचे आहे. त्यासाठी सत्कर्म करून पुण्य खात्यात जमा करण्याचे आवाहन खरतरगच्छाधिपती आचार्य श्री मणिप्रभसागरजी यांच्या सुशिष्या पूज्य विराग ज्योतीश्रीजी महाराज यांनी केले.**

खान्देशज्योती श्रीजी, विरागज्योतीश्रीजी व विश्वज्योतीश्रीजी आदि ठाणा तीन यांचे शिंदखेड्यात रविवारी सकाळी ७.३० वाजता आगमन झाले. त्यांचे शिवाजी चौफुली वरून सवाद्य स्वागत करण्यात आले. यावेळी मूर्ती पूजक संघाचे अध्यक्ष रमेश टाटीया, कल्पेश कर्नावट, माजी नगरसेवक सुमित जैन, अक्षय बाफना, रवींद्र कवाड, मनिष बोथरा, वीरेंद्र कवाड, नयन बिनायक्या, हर्षल



कर्नावट, राजमल कर्नावट, गिरीश टाटीया, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक रोशन टाटीया, भागचंद कर्नावट, विजय कवाड, प्रा.चंद्रकांत डागा, प्रवीण पारख, रमेश कर्नाटक, मयूर ओस्तवाल, राजेंद्र बाफना आदी सहित महिला मोठ्या संख्येने होत्या.

शिवाजी चौफुली वरून वाजत गाजत महाराज श्री बस स्टॅण्ड वरून भगवा चौफुली जवळ स्थित आदिनाथ भगवान चे मंदिरात दर्शन घेऊन राजमल कर्नावट यांच्या निवास स्थानी आले. तेथे दिलेल्या प्रवचनात म्हणाले, आपल्यावर सिद्धांचे उपकार आहेत. ते मोक्षात गेले म्हणून आपले (पान ४ वर)

## आझाद नगर भागात एकाला जबर मारहाण

धुळे, दि.१७- येथील आझाद नगर परिसरामध्ये किरकोळ कारणावरून व्यवसायिकाला चार जणांनी जबर मारहाण केली. चौघांविरुद्ध चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. एजाज अहमद इम्तियाज अन्सारी (वय ३७) रा. फिरदोस नगर असे जखमीचे नाव आहे. दि.१५ मेस दुपारी तीनच्या सुमारास किरकोळ कारणावरून चौघांनी त्यांच्याशी वाद घातला, दांडक्याने मारहाण केली, ठार मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी संशयित एजाज अजीज प्रतापगढी, खलील अहमद एजाज, अहमद इम्तियाज, आवेश एकलाख अहमद, एकलाख अजिज प्रतापगडी सर्व रा. भोईवाडा, वडजाई रोड यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला.


दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,43,600 रु.+3% GST
सोने- 24 K -1,56,800 रु.+3% GST
चांदी- 2,70,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३



जांभुळ ज्युस मिळेल


नैसर्गिक पद्धतीने पिकवलेल्या जांभळा पासून तयार केलेला रस (ज्युस) उपलब्ध आहे. कोणताही रंग, संरक्षक (प्रिर्झव्हेटीव्ह), पाणी न टाकता बनवलेला जांभळाचा शुद्ध रस (ज्युस) 200.MLच्या काचेच्या बाटलीत उपलब्ध आहे.
संकेत नित्या फार्म
जनशक्ती बिल्डींग दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग- धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६


## एस.टी.भिषण अपघात दोन ठार, पंचवीस गंभीर

पुणे, दि.१७- पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील बेल्हे गुंजाळवाडी परिसरात कल्याण-अहिल्यानगर मार्गावर एस.टी.बसचा भीषण अपघात झाला. या अपघात दोघांचा मृत्यू झाला तर इतर पंचवीस प्रवासी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.

कल्याण- अहिल्यानगर महामार्गावर समोर चाललेल्या वाहनाला ओव्हरटेक करतांना चालकाचे नियंत्रण सुटल्याने एस.टी.बस खड्डयात उलटल्याने अपघात झाला. या अपघातात चालकासह एका प्रवाशाचा मृत्यू झाला आहे. या अपघातात बसचे मोठ्याप्रमावर नुकसान झाले आहे. अपघात होताच घटनास्थळी परिसरातील नागरिकांनी गर्दी केली.

## पोषण आहाराच्या तांदूळाचा अपहार दोघा मुख्याध्यापकांवर गुन्हा दाखल

**नंदुरबार, दि.१७ (प्रतिनिधी)- शालेय पोषण आहारासाठी असलेला तांदूळ शाळेतून विनापरवानगी रिक्षातून दुसऱ्या ठिकाणी नेत शासकीय मालाचा अपहार केल्याप्रकरणी दोघा मुख्याध्यापकांविरुद्ध नंदुरबार शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

नंदुरबार येथील अल्हाज काझी चिरागोद्दीन उर्दू प्राथमिक शाळा व अँग्लो उर्दू हायस्कूलमधील शालेय पोषण आहाराचा तांदूळ व इतर मालाचा अपहार झाल्याचा प्रकार उघडकीस आला. शाळेतील तांदूळ खासगी रिक्षा क्रमांक एमएच १९/ जेजे- ४४४८ मध्ये भरून विनापरवानगी दुसऱ्या ठिकाणी नेला जात होता. यावेळी तांदळाच्या साठ्यासह रिक्षा पकडण्यात आली.

शालेय पोषण आहाराचा तांदूळ शालेय आवाराबाहेर विनापरवानगी पाठवून अपहार करण्याचा उद्देश असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले. रिक्षातून १२, हजार ५०० रुपये किमतीचे तांदळाचे पाच कट्टे जप्त करण्यात आले.

याप्रकरणी नंदुरबार पंचायत समितीच्या प्रभारी पोषण आहार योजना अधीक्षक तथा शिक्षण विस्तार अधिकारी (पान ४ वर)

## बोरगाव येथे घरफोडी दोन ला. ऐवज लंपास

धुळे, दि.१७- शिरपूर तालुक्यातील बोरगाव येथील एका घरातून चोरट्यांनी दोन लाखांपेक्षा अधिक रुपयांचा ऐवज लंपास केला. शिरपुर शहर पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल झाला.

योगेंद्रसिंग मटेसिंग राजपुत यांचे बोरगांव येथे निवासस्थान आहे. शुक्रवारी पहाटे त्यांच्या घरात घरफोडी झाल्याचे उघडकीस आले. घराचे किचन रुमचे कड़ी उघडुन चोरट्यांनी घरात प्रवेश केला. घरातील कपाटातील सामान अस्ताव्यस्त फेकले. कपाटातील ठेवलेले सोन्या चांदीचे दागिने व रोकड चोरुन नेली. सोन्याचे पाच ग्रॅमचे कानातील झुमके, पाच ग्रॅमचे काप, (पान ४ वर)

## आश्रमशाळा अधिक्षकाने केली तोडफोड मोलगी पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल

**नंदुरबार, दि.१७ (प्रतिनिधी)- आश्रमशाळेच्या अधिक्षकाने वसतीगृह रॅम्पवर बसविलेल्या स्टीलची रेलिंग तोडून नासधूस केल्याची घटना सरी येथील शासकिय आश्रमशाळेच्या वसतीगृहात घडली आहे. याप्रकरणी मुख्याध्यापकांच्या फिर्यादीवरुन आश्रमशाळेच्या अधिक्षकाविरुद्ध मोलगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

अक्कलकुवा तालुक्यातील सरी येथील शासकीय आश्रमशाळेतील शाळा अधिक्षक संभा मारोती परसोडे यांनी एक अनुचित कृत्य केले आहे. कारण नसतांना आश्रमशाळेच्या वसतीगृह इमारतीजवळ दिव्यांग व इतर विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी बनविण्यात आलेला रॅम्पवरील स्टीलचा कठडा म्हणजे रेलिंगची तोडफोड केली आहे. यामुळे शासकिय मालमत्तेचे नुकसान झाले.

याबाबत माहिती मिळताच तळोदा येथील एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या प्रकल्प अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची दखल घेतली आहे. यासंदर्भात प्रभारी (पान ४ वर)

# आपला महाराष्ट्र

## बांधकाम व्यवसायावर मंदीची भीती निराधार

अर्थकारणाशी संबंध असलेल्या बहुतेक सर्वांनीच सोशल मीडियावर बांधकाम व्यावसायिकांच्या स्थितीबद्दलची चर्चा उपस्थित केलेली आहे. केवळ देशातीलच नव्हे तर चीनमधील रियल इस्टेटी बाबत त्यांनी काही गंभीर मुद्दे उपस्थित केलेले आहेत. चीनमध्ये सध्या तयार घरांचे दर सुमारे ७० टक्यांनी घसरले जणू काही २०२६ या वर्षाचे दर हे २० वर्षांपूर्वीचे म्हणजे २००५ या वर्षाचे वाटावेत एवढी घसरण घराच्या किमती झालेली आहे, तरीही लोक घरे घ्यायला तयार नाहीत कारण त्यांच्याकडे पैसा नाही आणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे त्यांच्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळलेली आहे. भारतात देखील ही परिस्थिती निर्माण होत असून पुढील सहा महिन्याच्या काळात भारतातील रियल इस्टेटच्या किमती २५ ते ३० टक्के कोसळण्याची शक्यता या तज्ज्ञांनी वर्तवली आहे. शहरात राहणारे अथवा खेड्यातून शहरात स्थायी झालेले शिकून सवरून नोकरीला लागलेले असंख्य तरुण जोडपे असे आहेत की स्वत:चे घर असणे किंवा फ्लॅट असणे हे त्यांचे जीवनातील मोठे स्वप्न असते आणि एकदा ते साकार झाले की गंगेत घोडे न्हाले असे त्यांना होते, त्यासाठी ते बँकांकडून किंवा इतर फायनान्स कंपन्यांकडून कर्ज घेतात, मिळणाऱ्या पगारातून व्याजासहित ते हप्ते फेडतात. पण कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे त्यांच्या नोकऱ्या धोक्यात आल्या असून अनेकांना घरी बसण्याची वेळ आलेली आहे, परिणामी त्यांची आवक कमी होणार असून बाकीचे खर्च भागविणे जिकिरीचे होणार आहे, त्यामुळे घरांच्या कर्जाचे हप्ते फेडणे त्यांना शक्य होणार नाही त्यामुळे त्यांनी रियल इस्टेटमध्ये गुंतवणूक करणे थांबविले आहे, हे बहुदा मध्यमवर्गीय किंवा सामान्य लोक असतात. त्यांचा खर्चाचा जेवढा आवाका असतो त्याच्या पेक्षा अधिक खर्च ते करू शकत नाही त्यामुळे त्यांना असे निर्णय घेणे भाग पडते. या सगळ्यांचा परिणाम मात्र बांधकाम व्यवसायामध्ये गुंतवणूक करणारांवर आपसूकच होतो. बांधकाम व्यवसायिकांनी कर्ज काढूनच ही गुंतवणूक केलेली असते. जर ती वसूल होत नसेल तर तोट्यात सदनिका विकणे भाग पडेल अशी परिस्थिती येत्या सहा महिन्यात निर्माण होऊ शकते असा अर्थतज्ज्ञांचा होरा आहे. तसे झाल्यास बांधकाम व्यवसायिकांना फार मोठा फटका बसणार आहे. आधीच पेट्रोल डिझेलचे दर वाढले. बांधकामाचे साहित्य महाग झाले बांधकाम मजुरांची मजुरी वाढली. त्यामुळे सदनिकांची कॉस्ट वाढली. असे असले तरी नोकरदार वर्ग परवडत नसूनही सदनिका घेत असे. पण आता परिस्थिती बदललेली आहे. लहान असो की मोठी शहरी असो या सर्व ठिकाणी तयार सदनिका अथवा फ्लॅट घेण्यास कोणी तयार नाही. धुळ्या सारख्या ठिकाणी मध्यवस्तीत कॉलनी परिसरामध्ये असंख्य इमारती पैसा ओतून उभ्या केल्या आहेत. जेवढ्या सदनिका त्यानी तयार केल्या तेवढीच दुकाने त्या त्या इमारतीत काढली. त्यातील २५ टक्के दुकाने गेली. बाकीचे पडून आहेत तेच हाल सदनिकांचे आहेत. असंख्य फ्लॅट प्रत्येक वसाहतीत उभ्या राहिलेल्या इमारतीत खरेदीदारांची वाट बघत आहेत. परंतु घेण्यास गिऱ्हाईक नाही अशी अवस्था आहे. त्यामुळे बांधकाम व्यावसायिकांची पंचाईत झालेली आहे.

रियल इस्टेट मधील व्यवहाराच्या संदर्भात काही तज्ज्ञांनी व्यक्त केलेले काही मुद्दे वास्तवाशी संबंधित आहेत.अनेक दावे अतिशयोक्त किंवा अंदाजावर आधारित वाटतात. चीनमध्ये रिअल इस्टेट कोसळली कारण त्या देशातील दोन महाकाय कंपन्या कर्जात बुडाल्या असून तेथील गृह प्रकल्प अडचणीत आले आहेत. काही शहरात घरांच्या किंमती त्यामुळे तीस ते चाळीस टक्यांपर्यंत खाली आल्या आहेत. या कंपन्यांची कामे ठप्प झाल्यामुळे लोकांचा त्यांच्यावरील विश्वास उडाला आहे त्यामुळे लोक सदनिका खरेदी करण्यास धजावत नाहीत. मात्र पूर्ण चीनमध्ये सत्तर टक्के दर कोसळले ही बाब अतिशयोक्तीची वाटते. असेही काहींचे म्हणणे आहे. चीन मध्ये जे काही घडले किंवा घडत असेल तशी परिस्थिती भारतात निर्माण होईल का या प्रश्नाचे उत्तर देखील नकारार्थी येते. कारण भारतातील परिस्थिती चीन पेक्षा वेगळी आहे. एकतर भारतात घरांची कमतरता आहे. भारतात अजुनही मोठ्या आणि मध्यम शहरात घरांना मागणी आहे.चीनमध्ये कर्ज वितरणा बाबत हात मोकळे असतात परंतु भारतात बरेच नियम कडक आहेत. भारतातील बँका आधी सुरक्षितता बघतात. मगच कर्जे देतात. शहरांकडे येणारांचा लोंढा अजून थांबलेला नाही. विशेषत: मुंबई, पुणे, बंगरूळू, हैद्राबाद या शहरात मागणी मोठी आहे. त्यामुळेच येत्या सहा महिन्यांत २५ ते ३० टक्के पर्यंत खरेदीत घसरण होईल असे ठाम पणे सांगता येत नाही. काही समस्या जरूर आहेत त्यात घरांच्या किंमती मध्यम वर्गीयांच्या आवाक्या बाहेरच्या आहेत. अनेक सदनिकांचे दर ५० ते ६० लाखांपर्यंत असून तेवढी ताकद मध्यमवर्गाची नाही. शिवाय आयटी क्षेत्रावर एक आयचा दबाव आहे.मोठमोठ्या प्रकल्पांवर ती टांगती तलवार आहे त्यामुळे नोकर कपातीची भीती मनात घर करून आहे. काही शहरांमध्ये घर राहण्यासाठी नसून गुंतवणुकीच्या साठी आहे अशी स्थिती निर्माण झाल्याचे त्या क्षेत्रातील तज्ञ सांगतात.

अमेरिका, इराण येथील युध्द परिस्थितीमुळे तणाव वाढला आहे. जागतिक पातळीवर अनिश्चितता वाढली असल्याने त्याचा फटका भारतातील गृहनिर्माण क्षेत्राला बसला आहे. आयटी क्षेत्रातील कर्मचारी कपातीमुळे खूप मोठी भीती निर्माण झाली आहे. गृह खरेदीदारांच्या अपेक्षाभंगामुळे रिअल इस्टेट कंपन्यांचे धाबे दणाणले आहे. भारतातील अशा अनेक कंपन्या आहेत की, त्यांचे कर्जामुळे धाबे दणाणले, व्याज वाढत आहे. शिवाय मोठमोठ्या कंपन्यांचे शेअर्स गडगडल्याने त्यांच्या भांडवलाची वाताहत होऊ पहात आहे त्यामुळेही ग्राहक फिरकत नाहीत.सरकारचे धोरण बेघरांना घरे देण्याचे आहे. तो मुद्दा शहरांशी संबंधीत कमी आणि खेड्यांशी संबंधीत अधिक आहे. गरजा भागविण्याचे जे उपाय आहेत त्यात तयार सदनिका विकत घेण्याचा भाग महत्वाचा असतो.महाराष्ट्रातील शहरात पुणे मुंबई सोडले तर बाकीच्या शहरात आयटी क्षेत्राचा संबंध येत नाही. तिथे रोजगाराचे वेगवेगळे क्षेत्र आहेत. त्यांच्या कमाईचा अवाका बेतासबात असला तरी त्यांचेही स्वत:च्या घराचे एक स्वप्न असते. तेव्हा त्यांचा संबंध बांधकाम व्यावसायिकांशी येतो. अशा लोकांची संख्या फारशी नसते. किंवा त्यांच्या घराच्या गरजा संपलेल्या असतात. तेव्हा उरतो प्रश्न मोठ्या शहरांचा. तेथील मागणी प्रमाणे पुरवठा चालूच असतो. चढ उतार ही चालूच असतात.सध्या युध्दाचा प्रश्न समोर आहे. त्यामुळे भारतात ज्या समस्या निर्माण झाल्या त्या गुंतागुंतीच्या आहेत.

बाजारात महागाई मुळे जे प्रश्न निर्माण झाले ते वेगळे आहेत. पंतप्रधानांनी सोने खरेदी करू नका, पेट्रोल डिझेल कमी वापरा काटकसर करा असे आवाहन केल्यामुळे आणखी काही प्रश्न निर्माण झाले आहेत.त्याचा परिणाम बांधकाम क्षेत्रावर अवश्य होतो.त्यामुळे रियल इस्टेटच्या व्यवहारात मंदी आलेली दिसते. त्यासंबंधीचे झटके बांधकाम व्यावसायिकांच्या अर्थव्यवस्थेवर पडलेले आहेत पण महाराष्ट्रात किंवा भारतात एवढी हाताबाहेर परिस्थिती गेलेली नाही.त्यामुळे चीनचे मापदंड आपल्याकडील परिस्थितीला लावता येणार नाहीत. मात्र आपल्याकडे शहरागणिक परिस्थिती बदललेली दिसते.पुण्या सारख्या शहरात गेल्या पाच सहा वर्षांत सदनिकांच्या किंमती मोठ्या प्रमाणावर वाढल्या. हिंजवडी, वाकड, खराडी, बाणेर, तळेगाव या भागात २०१८–१९ या वर्षात ५०–६० लाखात मिळणारे फ्लॅट आता ७० लाख ते एक कोटी पर्यंत पोहचले असे बांधकाम क्षेत्रातील लोक सांगतात.कारण त्या भागात आय टी कंपन्या मोठ्या प्रमाणावर निघिल्या, मेट्रोचे प्रकल्प आले, पायाभूत सुविधा वाढल्या, अतिजलद रस्ते आले. अशी माहिती तज्ञ देतात. बहुदा पुण्यातील रिअल इस्टेट आय टी क्षेत्रावर अवलंबून आहे. आणि हे क्षेत्र एआयच्या हस्तक्षेपामुळे रोजगार मुक्त होत आहे. म्हणजे या क्षेत्राला आता मनुष्य शक्तीची गरज नाही. त्याचाही परिणाम या व्यवसायावर झाला. बांधकाम क्षेत्र दोनशे पेक्षा अधिक उद्योगांशी जोडलेले आहे. सिमेंट, वाळू, खडी, इलेक्ट्रिक साहित्य, लाकूड अर्थात फर्निचर यात वाढ झाली. त्यामुळे या व्यवसायात मंदी आली.बराचसा परिणाम युध्दाचा झाला. उद्या अशीच स्थिती राहील असे नाही. यात सुधारणा होऊ शकते. पण भांडवलदारांनी देखील यात चलन फुगवटा तयार केला असे अर्थतज्ञांचे म्हणणे आहे. जरी फ्लॅट विकले जात नसले तरी बिल्डर किंमती कमी करण्यास तयार नसतात. बरेच लोक गुंतवणूक म्हणून सदनिका खरेदी करतात. त्यामुळे व्यावसायिक कृत्रिमरीत्या किंमती काबूत ठेवतात. म्हणून इस्टेट दिसते पण खप होत नाही अशी स्थिती निर्माण होते. जर नोकऱ्यांवर परिणाम झाला तर मागणी कमी होईल. विक्री मंदावेल आणि गुंतवणूक पडून राहील. शहरीकरण मंदावले तर ही परिस्थिती आणखी बिघडेल.पण तसे होत नाही. सायकल चालू राहते. चालत राहील आणि शहरीकरण ही चालूच राहील त्यामुळे अर्थव्यवहार देखील चालूच राहील यात शंका नाही.

## देवरे अभियांत्रिकी महा.त पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा उत्साहात संपन्न

**धुळे, दि.१७- श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजीराव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयात ईलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग विभागात इन्स्टिटयूट ऑफ ईलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन्स इंजिनिअर्स आय.ई.टी.ई. च्या वतीने ईलेक्ट्रॉनिक्स इनोव्हेशन्स जर्नी थ्रु पेटंटस या विषयावरील पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते, त्यात ईलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग व ईलेक्ट्रॉनिक अँड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उत्साहात सहभागी झाले.**




महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. हितेंद्र पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. ईलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा.डॉ. विनोद शिंदे, ॲकॅडमीक डिन प्रा.डॉ.संगीता राजपूत, सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा.डॉ. जितेंद्र व्यास, ट्रेनिंग प्लेसमेंट अधिकारी प्रा.डॉ. सागर मोरे, स्पर्धेचे परिक्षक प्रा.एस.व्ही. पवार, मेधा जोशी, प्रा.डॉ. संगीता राजपूत, प्रा.डॉ. मयूर अग्रवाल तसेच प्रा.डॉ.एम.जे. गर्दे, प्रा. दिपमाला पाटील व ईलेक्ट्रॉनिक इंजिनिअरिंग विभागातील सहकारी प्राध्यापक वृंद उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. हितेंद्र पाटील यांनी विद्यार्थ्यांनी अशा स्पर्धांमध्ये सहभागी होऊन विजेते होण्यासाठी व निपुण अभियंता होण्यासाठी प्रयत्नशील रहाण्याचे आवाहन केले विद्यार्थ्यांना स्पर्धेतील यशासाठी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेत ईलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग विभागातून चैताली चौधरी, जयेश महाले, मानसी माळी यांनी प्रथम क्रमांक मिळविला, अ गटातून अनुष्का देव, किर्ती देसले, कल्याणी पाटील, यांनी व ब गटातून रुपाली बडगुजर व अस्मिता बोरसे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच ईलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागातून रुपाली भदाणे, पल्लवी मोरे, देवयानी पितृभक्त यांनी प्रथम क्रमांक मिळविला, अ गटातून तेजस्विनी भारती, युक्ता हिरे यांनी व ब गटातून प्रेरणा भामरे,वैष्णवी भामरे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला, तन्वी पाटील, मिनल सूर्यवंशी, दिशा चौधरी, धृवीका वाघ यांनी तृतीय क्रमांक मिळविला. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते सहभाग प्रमाणपत्रे व पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या उत्साहात पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा संपन्न झाली. श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष कुणाल पाटील, महाविद्यालयाचे अध्यक्ष सुभाष देवरे, उद्योजक विलास देवरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात ईलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग विभागाने या स्पर्धेचे संयोजन केले.

## द्वारकाधीश मंदिरात काकड आरती

नंदुरबार, दि.१७ (प्रतिनिधी)- अधिकमास अर्थात पुरुषोत्तम मास निमित्त शहरातील हाट दरवाजा परिसरातील श्री द्वारकाधीश मंदिरात काकड आरती धार्मिक उपक्रमास प्रारंभ झाला आहे. परमपूज्य विठ्ठल स्वामी महाराजांनी दोनशे वर्षांपूर्वी स्थापित केलेल्या श्री द्वारकाधीश मंदिरात दि. १७ मे पासून दररोज सकाळी सहा वाजेला काकड आरतीस प्रारंभ झाला आहे. पहिल्या दिवसापासून भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. काकड आरती निमित्त दररोज सकाळी भजन संध्या, भाव गीतांनी मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. दि. १५ जून रोजी समाप्ती होणार आहे. पवित्र अधिक मास अर्थात पुरुषोत्तम मास धोंड्याचा महिना निमित्त भाविकांनी काकड आरती या धार्मिक उपक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री द्वारकाधीश मंदिर संस्थान भक्त परिवारातर्फे करण्यात आले आहे.

## शहादा येथे भाजपची दोन दिवसीय कार्यकर्ता प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न




**शहादा,दि.१७ (का.प्र.)- भारतीय जनता पार्टी नंदुरबार जिल्ह्याच्या वतीने आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाभियान अंतर्गत शहादा येथे दि. १६ व १७मे रोजी आयोजित दोन दिवसीय निवासी कार्यकर्ता प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.**

आगामी काळातील संघटनात्मक बांधणी आणि कार्यकर्त्यांच्या वैचारिक जडणघडणीच्या दृष्टीने ही कार्यशाळा अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.कार्यशाळेचे उद्घाटन भाजपचे नंदुरबार जिल्हा प्रभारी बबनराव चौधरी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून व भारतमाता, पंडित दीनदयाल उपाध्याय आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपचे जिल्हाध्यक्ष निलेश माळी होते.या दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिराला जिल्ह्यातील भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी हजेरी लावली. यामध्ये प्रामुख्याने आमदार राजेश पाडवी, माजी खासदार डॉ. हिनाताई गावित, प्रदेश सदस्य डॉ. शशिकांत वाणी आणि प्रा. पंकज पाठक, शहादा नगरपालिका उपनगराध्यक्षा सौ.माधवीताई मकरंद पाटील, भाजपाचे जिल्हा महामंत्री सदानंद रघुवंशी, कैलास चौधरी, डॉ. सत्यानंद गावित आणि जिल्हा उपाध्यक्ष जयपालसिंह रावल यांच्यासह जिल्ह्यातील विविध आघाड्यांचे प्रमुख, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या अंत्योदय विचारांवर आधारित पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवणे आणि संघटनात्मक कौशल्ये विकसित करणे हा या निवासी कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे. दोन दिवसीय कार्यशाळेत पक्षाचा इतिहास, सद्यस्थितीतील राजकीय आव्हाने, केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजना आणि सोशल मीडियाचा प्रभावी वापर यांसारख्या विविध विषयांवर तज्ज्ञ वक्त्यांद्वारे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.पहिल्या दिवशी उद्घाटनानंतर विविध सत्रांना सुरुवात झाली.संपूर्ण जिल्ह्यातून आलेल्या कार्यकर्त्यांमध्ये या प्रशिक्षणामुळे मोठा उत्साह पाहायला मिळाला. शहादा शहरातील व्हीएसएस लॉन्स येथे या निवासी शिबिरासाठी चोख व्यवस्था करण्यात आली होती. प्रशिक्षण शिबीर यशस्वी करण्यासाठी शहर व तालका भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## उपनगराध्यक्षा माधवी पाटील यांचा पाठपुरावा;डोंगरगाव चौफुली लख्ख

**शहादा, दि.१७(का.प्र.)- गेल्या अनेक दिवसांपासून अंधाराच्या साम्राज्यात अडकलेली शहादा शहरातील बायपास रस्त्यावरील डोंगरगाव चौफुली आज अखेर पुन्हा एकदा प्रकाशाने उजळून निघाली आहे. येथील बंद असलेले हायमस्ट लाईट पूर्ववत सुरू करण्यात आले असून, यामुळे स्थानिक नागरिक आणि प्रवाशांनी सुटकेचा श्वास सोडला आहे.**

या चौफुलीवर नेहमीच वाहनांची आणि नागरिकांची मोठी वर्दळ असते. मात्र, लाईट बंद असल्याने रात्रीच्या वेळी अपघाताचा धोका वाढला होता आणि सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. ही गंभीर समस्या ओळखून शहादा शहराच्या उपनगराध्यक्षा सौ. माधवीताई मकरंद पाटील यांनी तातडीने लक्ष घातले. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा, कठोर मेहनत आणि जनतेप्रती असलेल्या बांधिलकीमुळे अखेर हा प्रलंबित प्रश्न मार्गी लागला आणि चौफुलीवरील हायमस्ट लाईट पुन्हा एकदा दिमाखात सुरू झाले.या रस्त्यावरून दररोज प्रवास करणारे शेतकरी, रात्री उशिरापर्यंत अभ्यास करून घरी परतणारे विद्यार्थी, नोकरदार आणि स्थानिक नागरिकांसाठी हा केवळ भौतिक प्रकाश नाही, तर तो त्यांच्या सुरक्षिततेचा आणि विश्वासाचा उजेड ठरला आहे. लाईट सुरू झाल्याने चौफुलीचा परिसर आता पूर्णपणे सुरक्षित आणि प्रकाशमय झाला आहे. जनतेच्या समस्यांना नेहमीच आपली स्वत:ची जबाबदारी समजून, त्या सोडवण्यासाठी तत्परतेने धावून जाणाऱ्या लोकनेत्या सौ. माधवीताई पाटील यांचे शहादा शहरातील नागरिकांकडून आणि वाहनधारकांकडून मन:पूर्वक आभार मानले जात आहेत.या यशस्वी कामानंतर भावना व्यक्त करताना माधवीताई पाटील म्हणाल्या,लोकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसला की, केलेल्या कामाचं खरं समाधान मिळतं. जनतेची सेवा हेच आमचे मुख्य ध्येय असून शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या सोयीसाठी आमचे प्रयतक असेच अखंड सुरू राहतील.

## मुकेश पटेल सीबीएसई बारावीचा निकाल शंभर टक्के

**शिरपूर, दि.१७- श्री विलेपार्ले केळवणी मंडळ, मुंबई संचलित तांडे ता. शिरपूर येथील मुकेश आर. पटेल सीबीएसई निवासी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता बारावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकाल नोंदवत आपल्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा सिद्ध केली आहे.**

विद्यार्थ्यांच्या मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्यामुळे हा उल्लेखनीय यशाचा टप्पा गाठता आला आहे.या यशस्वी निकालात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. शाळेतून युगांक जयपालसिंग राजपूत याने ८८.६० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. जेविन दिनेश पुजारी याने ७९.६० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर ध्रुव दीपक शेवणकर याने ७४ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त करुन उल्लेखनीय यश संपादन केले.

या यशाबद्दल एस.व्ही. के.एम. संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिश पटेल, संस्थेचे सहअध्यक्ष भूपेश पटेल, उपाध्यक्ष चिंतन पटेल, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, सर्व ट्रस्टी, प्राचार्या मंजु सिंह यांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### पान १ वरुन

## नीट पेपरफुटीवर गांधींचे सरकारसाठी तीन प्रश्न

धर्मेंद्र प्रधान यांच्यावरही निशाणा साधला. ते म्हणाले की, शिक्षणमंत्र्यांनी २२ लाख नीट विद्यार्थ्यांची फसवणूक केली आहे. संसदेचा अपमान केला आहे. संसदीय समितीच्या अहवालात विरोधी पक्षाचे खासदार होते. केवळ याच कारणामुळे तो फेटाळण्यात आला. ज्या सरकारचा संसदेवर विश्वास नाही, ते नीट सुधारणांवर विश्वास ठेवू शकत नाही. यावेळी राहुल गांधी यांनी शिक्षणमंत्र्यांना तात्काळ पदावरून हटवण्याची मागणी केली आहे.

**नीट पेपरफुटीचा संदर्भ दिला**

आपल्या पोस्टमध्ये राहुल गांधी यांनी लिहिले आहे की, २०२४ मध्ये नीट पेपरफुटी झाली होती. परंतु, परीक्षा रद्द झाली नाही किंवा कोणत्याही मंत्र्याने राजीनामा दिला नाही. त्यावेळी या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला होता आणि एक समिती स्थापन करण्यात आली होती. त्यांनी पुढे म्हटले की, २०२६ मध्ये पुन्हा नीट पेपरफुटी झाली. यावेळी परीक्षा रद्द करण्यात आली, परंतु शिक्षणमंत्र्यांनी अद्याप राजीनामा दिलेला नाही. सीबीआय या प्रकरणाचा तपास करत असून एक नवीन समिती स्थापन केली जाईल.

राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींना तीन थेट प्रश्न विचारले आहेत. त्यात वारंवार पेपरफुटी का होत आहे, याचे उत्तर देशाला हवे आहे. परीक्षा पे चर्चा यावर सरकार गप्प का आणि सातत्याने अपयशी ठरलेल्या शिक्षणमंत्र्यांना पदावरुन का हटवले जात नाही, या प्रश्नांचा समावेश आहे.

**सरकार जबाबदारीपासून पळते**

राहुल गांधी यांनी आरोप केला की, मोदी सरकार जबाबदारी स्वीकारण्याऐवजी प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करत आहे. सरकार आधी बराच काळ गप्प बसते, नंतर गुन्हेगारांचे संरक्षण करते आणि जे प्रश्न विचारतात त्यांच्यावर हल्ला केला जातो. नीट पेपरफुटीनंतरही एकाही मंत्र्याने राजीनामा दिला नाही. त्यांनी असाही आरोप केला की, २०२४ मध्ये नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या महासंचालकांना पदावरून हटवून नंतर मुख्यमंत्र्यांचे मुख्य सचिव बनवण्यात आले.

**एनटीए बाहेर विद्यार्थ्यांचे आंदोलन**

नीट पेपरफुटीवरून विद्यार्थ्यांचा संताप वाढतच आहे. शनिवारी, एनएसयूआयच्या नेतृत्वाखाली शेकडो विद्यार्थ्यांनी एनटीए कार्यालयाबाहेर आंदोलन केले. आंदोलकांनी आरोप केला की, भ्रष्ट एनटीए आणि मोदी सरकारने नीट घोटाळ्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त केले आहे. आंदोलकांनी दोन मुख्य मागण्या केल्या. पहिली, केंद्रीय शिक्षणमंत्र्यांची हकालपट्टी आणि दुसरी, एनटीएवर बंदी.

### शब्दकोडे क्रमांक : २३६७




**आडवे शब्द :** १. महाराष्ट्रातील एक जिल्हा ४. वाईट इच्छा ६. दीप ८. नापास विरुद्ध ९. इंग्रजीत तळपायाचची बोटं १०. भात आणि भाजी मिळून तयार होणारे खाद्यपदार्थ ११.एक चवदार मासा १४.चौकात एकत्रित बसून गप्पा मारण्याची जागा १६. तग १७. एक गोड पेय १८.आब,इज्जत २१. हिंदीत द्वेष २३.बशीचा जोडीदार,चहा पिण्याचे पात्र २५.वाद्य वाजवणारा २८. रुची ३०. नशीब इंग्रजीत ३२. कारणीभूत ठरलेला ३४.भारताचे राष्ट्रीय फूल ३५. बंध ३७. नजर ३८. संगीत सप्तकातील अखेरचा स्वर ३९. हाव ४०. खरा - विरुद्ध ४१. विचार ४३. सप्त सुरांची धून ४७. वचन ४९. थोर कृष्ण सखा ५०. पाणी ५१. आळ ५३. मनुष्य ५४. टावरासु- उलट लिहा

**उभे शब्द :** १.नरकाचे अधिपती २. शोध ३. महिना ५. रियाज ६. मनास तात्पुरता मिळालेला आनंद ७. मोकळीक १२. वांती १३. पुन्हा १४.एक काल्पनिक पक्षी १५. इंग्रजीत- खोल १७. हुशार १९. चपाती भाजण्याचे साधन २०. चक्र २२. अंतर २४. क्षण २६. बाद- उलट लिहा २७. बंधनात नसलेला २९. मजदूर ३१. गोंधळ ३३. रोकड ३६. लाकडाची पेटी ३९. हिंदीत - मेण ४२. ग्रामीण बोलीत तेव्हा ४३. नेहमी ४४. गोंगाट ४५. स्त्री कलाकार हिंदी ४६. वाजवी दरातला ४८. संगीतातील एक राग ५२. नफा विरुद्ध

**शब्दकोडे क्रमांक : २३६६ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शि | व | से | ना | ■ | म | न | मा | नी | ■ | वा | व |
| का | ■ | वा | ■ | सा | ल | स | ■ | ट | र | फ | ल |
| री | घ | ■ | क | ल | म | ■ | का | ■ | सा | ■ | य |
| ■ | र | वा | ळ | ■ | ल | ल | का | र | ■ | ह | ■ |
| खो | टे | ■ | प | ती | ■ | त | ■ | म | द | म | स्त |
| ड | ■ | ना | ■ | न | वा | ■ | ह | मा | ल | ■ | र |
| ■ | बे | का | बू | ■ | त | न | ■ | ण | ■ | मे | ■ |
| चा | ल | ■ | ट | र | ■ | त | म | ■ | क | ह | र |
| ■ | न | ड | ■ | शी | त | ■ | द | वा | ■ | न | व |
| दु | ■ | ग | ट | ■ | र | पे | ट | ■ | छ | त | ■ |
| का | य | र | ■ | पा | ■ | ट | ■ | ग | प्प | ■ | आ |
| न | स | ■ | न | व | री | ■ | घो | ■ | र | मा | ई |




## संरक्षणशास्त्रात जागृती कोळी नाशिक विभागात प्रथम

शिरपूर, दि.१७- तालुक्यातील खंबाळे येथील आर. सी. पटेल उच्च माध्यमिक विद्यालयाने बारावी बोर्ड परीक्षेच्या निकालात आपले वर्चस्व कायम राखले आहे. विद्यालयाची कला शाखेची विद्यार्थिनी जागृती भाईदास कोळी हिने दैदिप्यमान यश संपादन करत संरक्षणशास्त्र विषयात नाशिक विभागात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे. जागृती कोळी हिने कला शाखेत ८९.१७ टक्के गुण मिळवून तालुक्यात प्रथम तर धुळे जिल्ह्यात तृतीय क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे, तिने संरक्षणशास्त्र विषयात १०० पैकी ९८ गुण मिळवून नाशिक विभागात प्रथम क्रमांक मिळवत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

प्रकाश में आज – परिचय




जितेंद्र, जय भादुरी, संजीवकुमार, प्राण, विनोद खन्ना, गीता




# आर.सी.पटेल अनुदानित आश्रमशाळेत रंगला आठवणींचा सोहळा उत्साहात

**शिरपूर, दि.१७- तालुक्यातील निमझरी येथील आर. सी. पटेल अनुदानित आश्रमशाळेत रंगला आठवणींचा सोहळा संपन्न झाला.**

इयत्ता सातवी व इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा आठवणींचा सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक जी. एम. पाटील होते. प्रमुख अतिथी प्राचार्य पी. पी. चव्हाण उपस्थित होते. यावेळी शाळेतील सर्व ज्येष्ठ शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता सातवीतील विद्यार्थी रोशन पावरा व कुणाल पावरा यांनी आत्मविश्वासाने केले. इयत्ता सातवीचे विद्यार्थी माध्यमिक विभागात प्रवेश करणार असून इयत्ता चौथीचे विद्यार्थी उच्च प्राथमिक वर्गात प्रवेश करणार असल्याने त्यांच्या निरोपार्थ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या प्राथमिक शिक्षणातील विविध आठवणींना उजाळा दिला. तसेच विद्यार्थ्यांनी शाळेला भेटवस्तू म्हणून भगवान बिरसा मुंडा व वीर एकलव्य यांच्या प्रतिमा अर्पण केल्या. शाळेतील शिक्षकांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

**CHANGE NAME**

MY OLD NAME WAS **JIJABAI RAJU CHAVHAN** MY NEW NAME IS **JIJABAI RAJU PARADHI** AS PER MY DOCUMENTS
**ADD- AT. POST MORANE PR.LALING, DIST.DHULE.**

**CHANGE NAME**

MY OLD NAME WAS **RAJU BHASKAR CHAVHAN** MY NEW NAME IS **RAJU BHASKAR PARADHI** AS PER MY DOCUMENTS
**ADD- AT. POST MORANE PR.LALING, DIST.DHULE.**

# आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीचे डॉ. निलेश शिंदेना पीएच.डी. प्रदान

**शिरपूर,दि.१७ - शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागात कार्यरत असलेले प्रा. निलेश मोहन शिंदे यांना मेडीकॅप्स विद्यापीठ, इंदोर, मध्य प्रदेश येथून यांत्रिकी अभियांत्रिकी विषयात डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली.**



परफॉर्मन्स इव्हॅल्युएशन ऑफ सोलर एअर हीटर विथ इंटिग्रेशन ऑफ ऑर्गुमेंटेड अबसॉर्बर प्लेट हा डॉ. निलेश शिंदे यांच्या संशोधनाचा मुख्य विषय होता. या संशोधनामध्ये सौर ऊर्जा क्षेत्रातील सोलर एअर हीटरची कार्यक्षमता वाढविण्यासाठी हेक्सागोनल रिब्सयुक्त अबसॉर्बर प्लेटचा वापर करून उष्णता हस्तांतरण व थर्मो-हायड्रॉलिक कार्यक्षमतेचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे.या संशोधनामध्ये सर्क्युलर डक्ट सोलर एअर हीटरमध्ये विविध ब्लॉकेज अनुपात आणि रिब अँगलच्या सहाय्याने उष्णता हस्तांतरणामध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे सिद्ध करण्यात आले. विशेषतः हेक्सागोनल रिब्समुळे हवेच्या प्रवाहामध्ये अधिक टर्ब्युलन्स निर्माण होऊन उष्णता हस्तांतरणात सुधारणा झाल्याचे आढळून आले. या संशोधनातून सौर ऊर्जा उपकरणांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी प्रभावी व आर्थिकदृष्ट्या उपयुक्त तंत्र विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ऊर्जा बचत, औद्योगिक प्रक्रिया, कृषी क्षेत्रातील सौर उष्णता प्रणाली तसेच पर्यावरणपूरक ऊर्जा साधनांच्या विकासासाठी हे संशोधन भविष्यात महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

या संशोधन कार्यासाठी त्यांना मेडीकॅप्स विद्यापीठ, इंदोर येथून संशोधन मार्गदर्शक डॉ. हिमांशू बोराडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. संशोधन कालावधीत त्यांनी स्कोपस सूचीबद्ध नियतकालिकांमध्ये संशोधनपर शोधनिबंध प्रकाशित केले असून विविध आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग घेऊन आपल्या संशोधनाचे सादरीकरण केले आहे. या संशोधन कार्यात डॉ. शिंदे यांना त्यांचे विभाग प्रमुख डॉ. प्रविण सरोदे आणि सहकारी प्राध्यापकांचे विशेष सहकार्य मिळाले.

डॉ. निलेश शिंदे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिश पटेल, ट्रस्टी जयश्री पटेल, कार्याध्यक्ष भूपेश पटेल, नगराध्यक्ष चिंतन पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे. देवरे, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, मित्र परिवार यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. प्रा.निलेश शिंदे यांना पीएचडी मिळाल्यामुळे आर सी पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होईल, असा आत्मविश्वास महाविद्यालयाकडून व्यक्त होत आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, सरकारी निमसरकारी संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : तुकडी जि. धुळे पोट तुकडी तालुका धुळे पैकी मौजे लळींग येथील गट नं. १०१ यापैकी प्लॉट नं. ५१/अ एकूण क्षेत्रफळ १३४/७५ चौ. मी. बखळ प्लॉट मिळकत यासी मापे व चतु:सिमा खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस : | ११ मी. | ९ मी. रस्ता, |
| पश्चिमेस : | ११ मी. | प्लॉट नं. ४, ४६ |
| दक्षिणेस : | ११.५मी. | प्लॉट नं. ५२ब |
| उत्तरेस : | १३ मी. | प्लॉट नं. ५० |

येणे प्रमाणे चतु:सिमातील वर्णनाची मिळकत ही श्री. विठ्ठल सुखदेव बोरसे, रा. वर्षावाडी गजानन प्रोव्हिजनजवळ, मोहाडी उपनगर, धुळे ता. जि. धुळे यांचे मालकी व ताबे उपभोगातील असून त्यांनी आमचे अशिल यांच्याशी वरील मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार केलेला असून व्यवहारापोटी आमचे अशिल यांनी त्यांना बयाणा पोटी रक्कम दिलेली आहे. तरीही सदर वरील मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे सौदे, करार, बक्षिस, गहाण, दान, खावटी पोटगी, लिजडिड, भाडेपट्टा,वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, बोजे, ताबा, अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार इतर तबदिलीचे व्यवहार असतील तर सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर पुराव्यानिशी मुळ कागदपत्रांसह लेखी हरकत घ्यावी.सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाही.याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्बोज, र्निविवाद व हस्तांतरणीय आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीबाबत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व दाखविलेल्या कागदपत्रावरुन व सांगण्यावरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

ठिकाण धुळे दि. १७/०५/२०२६

**अ‍ॅड. परमेश्वर ए. चौधरी**

पत्ता : आधार कमल बंगलो प्लॉट नं. ४, अ नित्यानंद नगर, निरामय हॉस्पीटल मागे, ८० फुटी रोड, धुळे ४२४००१ मो. ९४२३२८९१००

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** मौजे धुळे म. न. पा. हद्दीतील स. नं. ४४४/१अ पैकी प्लॉट नं. ४ चे एकूण क्षेत्र २७९ चौ. मी. यापैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र २२५० चौ. फुट यापैकनी उत्तरपुर्वे भागाचे क्षेत्र ६७५ चौ. फुट यास सि. स. नं. १२८७७ यात आर. सी. सी. चे जुने दोन मजली बांधीव घर, नळ कनेक्शन वीज कनेक्शनसह अशी मिळकत तुम्हांस कायम खरेदी देण्याचा सौदा केला ती माझे मालकीची मिळकत त्याची चतु:सिमा मंजूर नकाशा प्रमाणे.

वर नमूद वर्णन केलेला घर/मिळकत ही १) मोईनोद्दीन शेख अनवर वगैरे ४ यांचे ज. मु. परवीन बानो अनवर शेख रा. धुळे यांचे मालकीचे व प्रत्यक्ष कब्जे ताबे उपभोगातील आहे. सदरची मिळकत आमचे अशिल यांना कायम खरेदी करण्याबाबत सौदा केला आहे व बयाणा अदा केलेला आहे. सबब आमचे अशिल वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

वर नमूद घर/मिळकतीवर नमूद केलेल्या मालका व्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, तारण, टाच, बोजा, खरेदी विक्री, करार, हस्तांतरण हिस्सा, व्यवहार, अधिकार अगर हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आंत आमचे खालील पत्त्यावर लेखी व मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात जाहीर केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

वरील कालावधीत कुणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील घर/मिळकत ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल वर नमूद घर/मिळकतीचा अंतिम व्यवहार पूर्ण करतील. आणि त्यानंतर कोणतीही तक्रार आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व सांगणेवरुन आमचे मार्फत दिली असे. धुळे दि. १७/०५/२०२६

**अ‍ॅड. लखमीचंद अ. गुजर** अ‍ॅडव्होकेट व नोटरी

ग. नं. २, घर नं. ३३२६, मुल्लावाडा, धुळे मो. ९४२३४९३०८९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, सरकारी निमसरकारी संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : तुकडी जि. धुळे पोट तुकडी तालुका धुळे पैकी मौजे मोराणे प्र. ल. येथील गट नं. ११/१/अ/१ भोगवटा वर्ग–१, यासी क्षेत्र २ हे. ८५ आर. या पैकी (गट नं. ११/१/क/१ या शेत मिळकतीच्या दक्षिणेला लागून गट नं. ११/२/अ या शेत मिळकतीच्या उत्तर सिमेपर्यंत क्षेत्र सुमो ३ एकर) जिरायत शेत मिळकत यासी चतु:सिमा खालील प्रमाणे पुर्वेस : गट नं. ११/१/अ/१,, पश्चिमेस : गट नं. ११/१/ब/१, दक्षिणेस : ९ मी. रस्ता, उत्तरेस : उत्तरेस : गट नं. ११/१/क/१ येणे प्राणे चतु:सिमातील वर्णनाची मिळकत ही श्रीमती उज्वला अनिल ठाकरे (पाटील) पाटील रा. मु. पो. मोराणे प्र. ल. ता. जि. धुळे यांचे मालकी व ताबे उपभोगातील असून त्यांनी आमचे अशिल १) श्री. वाल्केश गणपत चौधरी, रा. ७६, राजेंद्रसुरी नगर, धुळे २) अमोल हिम्मत पाटील रा. नकाणे ता. जि. धुळे ३) क्षितीज भगवान महाजन रा. ७२, प्रमोद नगर सेक्टर नं. ३, देवपूर धुळे यांच्याशी वरील शेत मिळकत मिळकतीच्या मालकांनी त्यांच्या वारसांच्या संमतीने विकसीत करारनामा Devolopement agreement आमचे अशिल यांच्या लाभात लिहून मे. नोटरीसाहेब धुळे यांच्याकडे नोंदवून दिलेले आहे. त्यानुसार आमचे अशिल वरील शेत मिळकत विकसीत करणार आहेत. वरील शेत मिळकत विकसीत करण्यासाठीचा संपूर्ण खर्च आमचे अशिल हे करणार आहेत. त्यामुळे विकसीत करण्याआधी कोणाचीही कोणत्याही स्वरुपाची तक्रार अथवा सदरील व्यवहारात कोणतीही अडचण येवू नये म्हणून सदर वरील मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे सौदे करार, बक्षिस, गहाण, दान, खावटी पोटगी, लिजडिड, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, बोजे, ताबा, विकसन करारनामा, अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार इतर तबदिलीचे व्यवहार असतील तर सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर पुराव्यानिनशी मुळ कागदपक्षत्रांसह लेखी हरकत घ्यावी. सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्बोज, निर्विवाद व हस्तांतरणीय आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकसीत करण्याचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व दाखविलेल्या कागदपत्रावरुन व सांगण्यावरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. १७/०५/२०२६

**अ‍ॅड. परमेश्वर ए. चौधरी**

पत्ता : आधार कमल बंगलो प्लॉट नं. ४, अ नित्यानंद नगर, निरामय हॉस्पीटल मागे, ८० फुटी रोड, धुळे ४२४००१ मो. ९४२३२८९१००

## जाहीर नोटीस नि. ७

**शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. (कनिष्ठ स्तर) यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज नं. ३७८/२०२६**

**१) रोहिदास नारायण पावरा, २) शिनाबाई नारायण पावरा,**
**३) जुगलीबाई मालसिंग पावरा,**
सर्व रा. महादेव दोंडवाडे पो. हिसाळे,
ता. शिरपूर जि. धुळे ... अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार

कै. नारायण मालसिंग पावरा (मृत्यू दि.२५/०५/२०२४)... मयत

ज्याअर्थी कै. नारायण मालसिंग पावरा हे दिनांक २५/०५/२०२४ रोजी राहत्या घरी महादेव दोंदवाडे पो. हिसाळे ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार नं. १ ते ३ हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत अर्ज दाखल झाला आहे. व मयत यांचा वारस केवळ अर्जदार हेच असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधीतांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. १७/०६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल. दि. ३०/४/२०२६

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज नं. ३५४/२०२६**
**नि. नं. ७ चौ. ता. १२/६/२०२६**

१) **कोकीलाबाई सुकलाल कोळी** रा. घोडसगांव पो. होळनांथे ता. शिरपूर जि. धुळे
२) **ज्ञानेश्वर सुकलाल कोळी** रा. प्लॉट नं. १, श्रीरामनगर, जळगांव जि. जळगांव
३) **रविंद्र सुकलाल कोळी**, रा. घोडसगांव पो. होळनांथे ता. शिरपूर जि. धुळे
४)**सुनंदाबाई जिजाबराव कोळी**, रा.प्रागणे डांगरी ता. अमळनेर, जि. जळगांव.. अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार

सुकलाल पौलाद कोळी मयताचा पत्ता : घोडसगांव पो. होळनांथे शिरपूर जि. धुळे मृत्यू दि. १५/०२/२०२६ ... मयत

ज्याअर्थी अर्जदार नं,१ यांचे पती व अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडील नामे सुकलाल पौलाद कोळी हे दि. १५/०२/२०२६ रोजी मौजे घोडसगांव ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं. १ ते ४ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीसने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारां व्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. १२/०६/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी, लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीचा वारस नाही असे गृहीत धरण्यात येवून, मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणी प्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर शिरपूर जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर — (कोर्टाचा शिक्का) — सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

## Required

**Principal**

Qualifications: B.A./M.A./B.Sc. /M.Sc., B.Ed./M.Ed., D.S.M.

**N.E.S.'s English Medium School**

Behind Sinchan Bhavan, Sakri Road, Dhule

**Office Time : 9.00 am - 12:00 pm**

Experienced, Qualified with Fluent English Candidates are invited to submit their Resume with self attested documents & Copy of Experience Certificate.

***Before Date : 20 May 2026***

**Contact : 9421451818/9325322537**

**Chairman**

Navjeevan Education Society's English Medium School, Sakri Road, Dhule.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे महिंदळे येथील कुमार नगर भागातील सि. स. नं. ६०६२ चे एकूण क्षेत्र ४९.३० चौ. मी. यात जुने विटा माती पत्रामधील बांधीव घर उर्वरित बखळ जागेसह, सत्ता प्रकार अ.

यासी चतु:सिमा

पुर्वेस : बोळ — पश्चिमेस : रस्ता
दक्षिणेस : सि. स. नं. ६०६३ — उत्तरेस : सि. स. नं. ६०६१

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक श्री. प्रकाशलाल लालचंद दुसेजा लुल्ला रा. ब्लॉक नं. के. ५, कुमारनगर, साक्री रोड, धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा करार, बक्षिस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह अ‍ॅण्ड लायस्नस, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी, विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही. तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. १७/०५/२०२६

**अ‍ॅड.रोहित राजकुमार छाबिडया**

ब्लॉक नं. आर/२, रुम नं. १, कुमारनगर, साक्री रोड, धुळे
मो. ९९२२८२८८८३/७४९९९९८९५५

## जाहीर नोटीस नि. ७

**शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. (कनिष्ठ स्तर) यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज नं. ३६८/२०२६**

**१) अनिल सुकदेव पाटील, २) नरेंद्र सुकदेव पाटील**
**सर्व अ. नं. १ व २ रा. प्लॉट नं. ३४ ब**
**महात्मा फुले नगर मांडळ रोड, वरवाडे ता. शिरपूर जि. धुळे**
**३) सुनिता राजेंद्र पाटील, रा. वरवाडे, ता. शिरपूर जि. धुळे.** . अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार

सुकदेव सखाराम पाटील, मृत्यू दि. ०२/११/२०१७..
रा. प्लॉट नं. ३४ ब, महात्मा फुले नगर,
मांडळ रोड, वरवाडे ता. शिरपूर जि. धुळे ... मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. शिरपूर न्यायालयात मयत सुकदेव सखाराम पाटील हे दिनाक ०२/११/२०१७ रोजी शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाब अर्ज दाखल केलेला आहे..

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास त्यांनी दि. २५/६/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३०वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हकरतीचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दि. २९/४/२०२६ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे. .

.कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस नि. ७

**शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. (कनिष्ठ स्तर) यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज नं. ३५२/२०२६**

१) **दिपकसिंग उमरावसिंग परदेशी**, उ.व. ४१, धंदा : मजूरी
२) **शकुंतलाबाई उमरावसिंग परदेशी**, उ.व. ७८, धंदा : घरकाम
अर्जदार नं. १ ते २ र. मु. पो. खंबाळे, ता. शिरपूर जि. धुळे
३) **सुनंदा गोरखसिंग राजपूत** उ.व. ५२, धंदा : गृहिणी
रा. मु. पो. रोटेगाव, ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर ... अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार

कै. उमरावसिंग गुलाबसिंग परदेशी (मृत्यू दि.०७/०९/२००६)... मयत

ज्याअर्थी उमरावसिंग गुलाबसिंग परदेशी हे दिनांक ०७/०९/२००६ रोजी राहत्या घरी मु. पो. खंबाळे, ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत अर्ज दाखल झाला आहे. व मयत यांचा वारस केवळ अर्जदार हेच असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधीतांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. १२/०६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल. दि. २९/४/२०२६

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस नि. ७

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज नं. ४३२/२०२६**

**दिलवरसिंग भिला पावरा**
रा. भोईटी पो. रोहिणी, ता. शिरपूर जि.धुळे ... अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार दिलवरसिंग भिला पावरा यांनी मे. न्यायालयात नामे भिला खंडू पावरा हे दि. ११/०५/२०२५ रोजी मौजे भोईटी ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे भिला खंडू पावरा यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि. २०/०६/२०२६ रोजी ठिक १०.३० वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस नि. ७

**शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. (कनिष्ठ स्तर) यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज नं. ३६२/२०२६**

**१) रजुबाई अरुण मिस्तरी, २) प्रमोद अरुण मिस्तरी**
**३) मनोज अरुण मिस्तरी, सर्व रा. वाघाडी ता. जि. धुळे....** अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार

अरुण संतोष मिस्तरी रा. वाघाडी ता. शिरपूर जि. धुळे
(मृत्यू दि.२१/१२/२०२३) ... मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. शिरपूर न्यायालयात मयत अरुण संतोष मिस्तरी हे दि. २१/१२/२०२३ रोजी मौजे शिंगावे ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले आहे. असून अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाब अर्ज दाखल केलेला आहे..

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास त्यांनी दि. १२/६/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३०वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हकरतीचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दि. २९/४/२०२६ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे. .

.कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज नं. ४६४/२०२६**
**नि. नं. ७ चौ. ता. २९/६/२०२६**

**१) भिकुबाई सिताराम बडगुजर**
**रा. म्हाळसानगर, रा. दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे**
**२) २.अ) दत्तू उर्फ दत्तात्रय मिठाराम बडगुजर (मयत)**
**२-अ) गंगाबाई दत्तू उर्फ दत्तात्रय बडगुजर**
**२-ब) अनिल दत्तू उर्फ दत्तात्रय बडगुजर**
**नं. २.अ व २-ब रा. माळी गल्ली, खालचे गांव शिरपूर जि. धुळे ....** अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार

सोजाबाई मिठाराम बडगुजर मयताचा पत्ता : माळी गल्ली खालचे गांव शिरपूर जि. धुळे मृत्यू दि. ०९/१०./१९९२ ... मयत

ज्याअर्थी अर्जदार नं,१ यांची आई अर्जदार नं. २–अ यांची सासू व अर्जदार नं. २–ब यांची आजी नामे सोजाबाई मिठाराम बडगुजर ह्या दि. ०९/१०/१९९२ रोजी मौजे दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे येथे मयत झालेल्या आहेत. मयतास अर्जदार नं. १ ते ५ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीसने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारां व्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. २९/०६/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.०० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी, लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही असे गृहीत धरण्यात येवून, मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणी प्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर शिरपूर जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर — (कोर्टाचा शिक्का) — सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज नं. ४६६/२०२६**
**नि. नं. . चौ. ता. २९/६/२०२६**

**१) गंगाबाई दत्तू उर्फ दत्तात्रय बडगुजर, २) अनिल दत्तू उर्फ दत्तात्रय बडगुजर**
दोन्ही रा. माळी गल्ली खालचेगांव ता. शिरपूर जि. धुळे. ... अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार

दत्तू उर्फ दत्तात्रय मिठाराम बडगुजर, मयताचा पत्ता : माळी गल्ली खालचे गांव शिरपूर जि. धुळे मृत्यू दि. २७/०१/२०२२ ... मयत

ज्याअर्थी अर्जदार नं,१ यांचे पती व अर्जदार नं. २ यांचे वडील नामे दत्तू उर्फ दत्तात्रय मिठाराम बडगुजर हे दि. २७/०१/२०२२ रोजी मौजे शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं. १ ते २ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीसने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदाराचा व्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. २९/०६/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.०० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकत सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी, लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही असे गृहीत धरण्यात येवून, मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणी प्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर शिरपूर जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर — (कोर्टाचा शिक्का) — सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस सर्व हितसंबंधितांना तसेच सर्व वित्तीय संस्था, राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, पतसंस्था व संबंधित मिळकतीचे हितचिंतकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिल सुदाम विष्णु माळी रा. वरवाडे ता. शिरपूर जि. धुळै यांनी दिलेल्या माहितीवरुन त्यांची मौजे शिरपूर वरवाडे नगरपरिषद हद्दीतील मौजे वरवाडे सर्व्हे नं. ६६/८/न अशी इतर हकदार सहीत सामाईक शेतजमीन असून तिचे क्षेत्रफळ ०.१८.०० हे. आर. पो. ख. ०.१ हे. आर. अशी मिळकत असून त्या मिळकतीमध्ये इतर अधिकारात रामा कौतिक यांचे नाव कुळस्वामीत्व चुकून लागलेले असून त्याबाबत फेरफार नोंद क्र. ८५३ ही सदर मिळकतीच्या उतार्‍यावर अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

अजून असे की, सदर शेत जमीनीचा ताबा हा रामा कौतिक याने सुपडाबाई सुकदेव माळी यांना सन १९७९ रोजी प्रत्यक्ष ताबा दिलेला होता. तशी नोंद देखील पिकपाहणी रकाण्यात नमूद केलेली होती व आहे. तरी सदरहू फेरफार नोंद क्र. ८५३ ही पोकळीस्त असल्याने त्याबाबत तसा अर्ज तहसिलदार सो. शिरपूर यांच्याकडे दिलेला आहे.

आता सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरहू इतर हक्कातील रामा कौतिक यांचे कोणी वारसदार असल्यास त्यांनी आमचे अशिलांना अथवा म. तहसिलदार सो. शिरपूर यांचे कार्यालयात प्रत्यक्ष भेटून कायदेशीर वेळेत म्हणजेच नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत हरकत नोंदवावी. व तसे पुरावे दाखवून त्याबात सविस्तर खुलासा सादर करावा. तसे न झाल्यास याबाबत रामा कौतिक यांचे कोणीही वारसदार किंवा हक्कदार नसल्याचे गृहीत धरुन पुढील कायदेशीर करवाई करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. सदरहू नोटीस पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन प्रसिद्ध केले असे. शिरपूर दि. १६/०५/२०२६

**अ‍ॅड. कुणाल के. राजपुत**

शिरपूर, जि. धुळे

## जाहीर नोटीस नि. ७

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज नं. ४२६/२०२६**

**१) रेहंदीबाई निर्मल पावरा, २) नारसिंग निर्मल पावरा,**
**३) मगन निर्मल पावरा** नं. १ ते ४ रा. खबांळे ता. शिरपूर जि. धुळे
५) सुनिता आनंद पावरा, रा. वकवाड, ता. शिरपूर जि.धुळे . . .
अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार रेहंदीबाई निर्मल पावरा, वगैरे यांनी मे. न्यायालयात नामे निर्मल मांगीलाल पावरा हे दि. ०५/०२/२०१५ रोजी मौजे खंबाळे ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे निर्मल मांगीलाल पावरा यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि. १९/०६/२०२६ रोजी ठिक १०.३० वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## पान १ वरुन

### ट्रम्प यांच्याकडून पुन्हा ईराणवर हल्ला करण्याचा संदेश

युद्धाची घोषणा करू शकतात, या भीतीमध्ये वाढ झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अमेरिका हल्ल्यांचे नियोजन करत आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांची ही सोशल मीडिया पोस्ट अशा वेळी समोर आली आहे, जेव्हा इराणबाबत लवकरच एखादा मोठा निर्णय घेतला जाण्याची शक्यता वर्तवणारे अहवाल प्रसिद्ध होत आहेत. अलीकडच्या काही दिवसांत, ट्रम्प यांनी वारंवार असा इशारा दिला आहे की, जर लवकरात लवकर एखादा तोडगा निघाला नाही, तर इराणसाठी कठीण काळ येऊ घातला आहे. दुसरीकडे, इराणनेही कोणत्याही संभाव्य हल्ल्याला जशास तसे आणि कठोर प्रत्युत्तर देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

एका अहवालात, द न्यूयॉर्क टाइम्सने असा खुलासा केला आहे की, अमेरिकन अधिकाऱ्यांनी इराणवर लष्करी हल्ले चढवण्यासाठी एक योजना तयार केली आहे. जिचे सांकेतिक नाव ऑपरेशन एपिक फ्युरी असे ठेवण्यात आले आहे. अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी स्पष्ट केले आहे की, जर परिस्थितीनुसार तसे करणे आवश्यक ठरले, तर परिस्थिती अधिक चिघळवण्यासाठी विशेषतः इराणवरील लष्करी हल्ल्यांची तीव्रता वाढवण्यासाठी अमेरिकेकडे सज्ज योजना उपलब्ध आहेत.

**विविध पर्यायांवर चर्चा**

न्यूयॉर्क टाइम्सच्या अहवालावरून असे सूचित होते की, अमेरिकेच्या या योजनेत अनेक पर्यायांचा समावेश आहे. यातील मुख्य रणनीती म्हणजे इराणच्या लष्करी आणि पायाभूत सुविधांशी संबंधित लक्ष्यांवर हवाई हल्ले चढवून इराणवर दबाव निर्माण करणे. दुसरा पर्याय म्हणजे इराणच्या भूमीवर विशेष मोहिमा राबवण्यासाठी भूदलाच्या सैनिकांना तैनात करणे. या व्यतिरिक्त अमेरिकन लष्कर खार्ग बेटावर ताबा मिळवण्याच्या योजनाही आखत असल्याचे वृत्त आहे. न्युयार्क टाईम्स या वर्तमानपत्राने असा दावा केला आहे की, अमेरिकेकडे एक सुसज्ज योजना तयार आहे. परंतु, ही कारवाई नेमकी कधी सुरू करायची या विषयीचा अंतिम निर्णय ट्रम्प यांनी अद्याप घेतलेला नाही. डोनाल्ड ट्रम्प एका बाजूला इराणला धमक्या देण्याचे सत्र सुरूच ठेवत आहेत. तर, त्याचवेळी चर्चेचे दरवाजेही खुले ठेवत आहेत. जर ट्रम्प यांनी लष्कराला कारवाईचे आदेश दिले, तर पश्चिम आशियामध्ये पुन्हा एकदा संघर्षाची ठिणगी पडू शकते.

**इराण आपल्या भूमिकेवर ठाम**

अमेरिकेच्या धमक्यांना इराणने जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. इराणच्या संसदेचे सभापती मोहम्मद बाकेर घालिबाफ यांनी स्पष्ट केले की, कोणत्याही आक्रमणाला तोंड देण्यासाठी आमची लष्कर सज्ज आहे. चुकीच्या निर्णयांचे परिणाम विपरीत होतात हे अमेरिकेने समजून घ्यावे, असा इशारा त्यांनी दिला. संवादाच्या मार्गासोबतच, युद्धाच्या पर्यायासाठीही आम्ही पूर्णपणे सज्ज आहोत, असे म्हटले आहे.

### पंतप्रधानांकडून सफाई कामगारांचा होतो सन्मान

यांनी अजब फतवा काढला आहे. यासंदर्भात राज्यातील सर्व स्वच्छतागृह चालकांनी राज्य परिवहन महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक यांना देखील पत्राद्वारे अवगत केले आहे.

येत्या एक जून पासून राज्यातील सर्व स्वच्छतागृह प्रवाशांसाठी मोफत खुले करण्याचा निर्णय परिवहन मंत्र्यांनी घेतला आहे. या उलट लाखो प्रवाशां कडून स्वच्छतेच्या नावाखाली प्रत्येक प्रवाशांकडून तिकीटामागे दोन रुपये उकळण्याचा प्रयतक खुद्द परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केला आहे. यामुळे मोफत सेवा कुठे ? असा प्रश्न उपस्थित होतो. राज्य शासनाने एक जून पासून सर्व बसस्थानकावरील स्वच्छतागृह मोफत वापराचा निर्णय घेतला मात्र प्रत्येक प्रवाशांकडून तिकिटाव्यतिरिक्त स्वच्छतेच्या नावावर दोन रुपये जादा आकारले जात आहे. उदा. कोळदे व खोंडामळी गावांमध्ये बसस्थानक नसताना तेथील प्रवाशांना विनाकारण दोन रुपये अदा करावे लागत आहेत. स्वच्छतागृहासह बसस्थानकावर वापर न करणाऱ्या प्रवाशांना देखील दोन रुपयांचा भुर्दंड बसत आहे. यामुळे प्रवाशांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे.

> **राज्यातील सर्वच बस स्थानकावरील स्वच्छता गृहाचा करार २०४० पर्यंत असताना राज्य शासनाचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी अत्यंत घाईगर्दीत आणि तातडीने स्वच्छतागृह रद्द करण्याचा निर्णय घेऊन अन्याय केला आहे. हा निर्णय त्वरित रद्द व्हावा अशी राज्यभरातून मागणी आहे.**
> **- कमल कडोसे,** अध्यक्ष मेहतर समाज सामाजिक शैक्षणिक संस्था, नंदुरबार

नंदुरबारसह महाराष्ट्रातील अनेक बस स्थानकावर स्थानिक सामाजिक संस्थांना करारावर प्रसाधन व स्वच्छतागृह चालवण्या साठी देण्यात आले आहेत. त्यानुसार नंदुरबार जिल्ह्यात मेहतर समाज सामाजिक शैक्षणिक संस्था नंदुरबार, शहादा आणि तळोदा येथील बस स्थानक स्वच्छतागृहांची देखभाल करीत आहे. या माध्यमातून किमान १५ कुटुंबांचा उदरनिर्वाह होत आहे. लाखो रुपये कर्ज काढून स्वच्छतागृह उभारले असून शासनाच्या निर्णयामुळे बेरोजगारी वाढून शेतकऱ्यांप्रमाणे आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे, शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे अनेक कुटुंबे रस्त्यावर येऊन उपासमारीची वेळ येणार आहे.या निर्णया मुळे मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला असून केंद्र आणि राज्य शासनात समन्वय नसल्याचे दिसून येत आहे.

### बनावट परवान्यावर खैर लाकडाची वाहतूक

चालकाकडे असलेल्या कागदपत्रांतील माहिती व ऑनलाइन नोंदीमध्ये तफावत आढळून आली. ही बाब लक्षात येताच चालक ट्रक घटनास्थळी सोडून पसार झाला.

वनविभागाने सदर ट्रक जप्त करून शासकीय विक्री आगार, नवापूर येथे आणून माल खाली केला. मोजमाप घेतले असता ट्रकमधून एकूण ८६२ नग खैर लाकूड, अंदाजे १९.५०२ घनमीटर जप्त करण्यात आले. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत अठ्ठावीस लाख पंचवीस हजार एकशे चोवीस इतकी असून याप्रकरणी प्रथम रिपोर्ट क्रमांक ०२/२०२५, दि.१५/०५/२०२६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही कारवाई वनसंरक्षक श्रीमती नीनू सोमराज धुळे, उपवनसंरक्षक संतोष सस्ते नंदुरबार, विभागीय अधिकारी दक्षता पथक राजेंद्र सदगीर धुळे, सहाय्यक वनसंरक्षक रोशन बुवा नंदुरबार - प्रादेशिक व वन्यजीव तसेच वनक्षेत्रपाल प्राशा पगार चिंचपाडा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

या कारवाईत वनपाल सुजित बेडसे, युवराज भाबड तसेच वनरक्षक शितल तोरवणे, सतीश पदमर, जितेंद्र पवार, रामदास पावरा, देवमन सूर्यवंशी, अमोल गावीत, राहुल गावीत, शिवराम गावीत, निताली गावीत यांच्यासह कायम व रोजनदारी वनमजूर आणि वाहनचालक यांनी सहभाग नोंदविला. सदर प्रकरणाचा पुढील तपास वनविभागाकडून सुरू आहे.

### अवधानच्या धनदाई नगरात चोरी

दिली. घटनेची माहिती मिळताच मोहाडी पोलीस तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पाहणी करत फिंगरप्रिंट तज्ज्ञ व श्वान पथकाच्या मदतीने तपास सुरू केला आहे. यात्प्रकरणी मोहाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, अज्ञात चोरट्यांचा शोध घेतला जात आहे.

### आश्रमशाळा अधिक्षकाने केली तोडफोड

मुख्याध्यापकांना पत्र देवून तत्काळ कारवाईचे आदेश दिले. याबाबत सरी शासकीय आश्रमशाळेचे प्रभारी मुख्याध्यापक देवजी होमा वसावे (वय ४०) रा. पिंपळखुटा, ता. अक्कलकुवा यांनी मोलगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार सरी आश्रमशाळेचे शाळा अधीक्षक संभा मारोती परसोडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलिस उपनिरीक्षक विकास पाटील करीत आहेत.

## पान १ वरुन

### अज्ञात वाहनाची धडक दुचाकीस्वार जागीच ठार

लावला. त्यामुळे मागून येणारी दुचाकी क्र.एमएच ३९/आर-५८३५ येवून अज्ञात वाहनावर धडकली. या अपघातात डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने दुचाकीस्वार सुरेश अमरसिंग तडवी यांचा जागीच मृत्यू झाला. अपघात घडताच वाहन चालक पसार झाला. याबाबत संदीप संपतलाल तडवी यांनी अक्कलकुवा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अनोळखी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक फौजदार नुर पिंजारी करीत आहेत.

### वलवाडीला विकास कामांचा खा.डॉ.बच्छावांच्या हस्ते शुभारंभ

बनवण्यात आलेला नसून पहिल्यांदाच या रस्त्याचे काम होत आहे. परिसरातील नागरिकांच्या विनंतीला मान देऊन व अडचणी लक्षात घेऊन डॉ शोभाताई बच्छाव यांनी आपल्या विकास निधीतून परिसरासाठी जी कामे मंजूर केली. अध्यक्षीय भाषणात खा.डॉ.बच्छाव यांनी धुळे शहरासाठी व विशेषता वलवाडी परिसरासाठी आपल्या निधीतून केलेल्या विकास कामांचा लेखाजोखा मांडला तसेच यापुढे देखील परिसरातील नागरिकांच्या समस्या सोडविण्याचे यावेळी आश्वासन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कपूरचंद बाविस्कर यांनी केले तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी अ‍ॅड. विवेक सूर्यवंशी, चंद्रशेखर खैरनार, अशोक बाविस्कर, भांबरे , देवरे, प्रवीण बाविस्कर, बन्सीलाल खलाणे, व परिसरातील नागरिकांनी प्रयत्न केले. यावेळी परिसरातील नागरिक व महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

### निंबोणी कोकणपाड्यातील कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी पक्षात प्रवेश

आणि कविता कोकणी प्रामुख्याने उपस्थित होते. पक्षाचा विस्तार आणि जनसेवा अधिक गतीने पुढे नेण्यासाठी सर्व नूतन सदस्यांचे पक्षात मनःपूर्वक स्वागत करण्यात आले.

निमगाव निंबोणी छोटू कोकणी, कविता छोटू कोकणी, सुपडया प्रताप वळवी, सविता वळवी, सुरूपसिंग कांतीलाल वळवी, सरिता सुरूपसिंग वळवी, जसपाल रतिलाल कोकणी, सुगंधा जसपाल कोकणी, बाबुराव राजला कोकणी, पनेश गोकुळ कोकणी, दिपाली कोकणी, मोहित छोटू कोकणी, महेश राजेंद्र वळवी, विवेक छोटू कोकणी यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

### बहुचर्चित नार-पार-गिरणानदी जोड प्रकल्पाचा कार्यारंभ

आणि कान्होळी नदी खोरे परिसर वर्षानुवर्षे दुष्काळी पट्ट्यात मोडतो. या भागाची तहान भागवण्यासाठी अरबी समुद्रात वाहून जाणारे पश्चिम वाहिनी नारपारऔरंगा नद्यांचे पाणी गिरणा उपखोऱ्यात वळवण्याचा पर्याय या क्षेत्रातील तज्ज्ञांनी सुचवला होता. त्यानुसार गेल्या अनेक वर्षांपासून नारपार प्रकल्पाची मागणी होत होती. यापूर्वीच्या अनेक निवडणुकांमध्ये हा प्रचाराचा मुद्दा देखील झाला होता. या सर्व पार्श्वभूमीवर गेल्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मंत्री दादा भुसे यांनी केलेल्या प्रयतकांना यश आले. ५ सप्टेंबर २०२४ रोजी ७४६५.२९ कोटींच्या या प्रकल्पास राज्य शासनाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**प्रकल्प दोन टप्प्यात पूर्ण होणार**

नार,पार गिरणा नदी जोड प्रकल्पाचे काम दोन टप्प्यात पूर्ण करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यातील ४११६.१० कोटींच्या कामातून १०.६४ टीएमसी पाणी उपलब्ध होणार आहे. यामुळे नाशिक व जळगाव या दोन्ही जिल्ह्यांतील शेती व पिण्याचा पाणीप्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा, कळवण, सटाणा, मालेगाव व देवळा परिसरातील सुमारे ८१२३० एकर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. तसेच जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव,भडगाव व एरंडोल तालुक्यातील ४२५६० एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे.

**लवकरच कामाचे भूमिपूजन**

या प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचा अभ्यास सध्या जलसंपदा विभागामार्फत सुरू आहे. या दुसऱ्या टप्प्यातून २०.६६ टीएमसी पाणी उपलब्ध होण्याची आशा आहे. हे दोन्ही टप्पे पूर्ण झाल्यानंतर उत्तर महाराष्ट्राच्या दुष्काळी भागाचे चित्र पालटण्यास मदत होणार आहे. दरम्यान, नारपार गिरणा नदीजोड प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील कामाचा कार्यारंभ आदेश जारी झाल्याने लवकरच या कामाचे भूमिपूजन होणार असल्याची माहिती शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिली आहे.

### सुशिनाल्यातील अतिक्रमणधारकांचे पुनर्वसन करा

त्याठिकाणच्या अतिक्रमणाबाबत कोणतीही नोटीस संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेली नाही. केवळ विशेष समाजाला टारगेट करून सुशिनाल्याच्या बाजुला कारवाई करण्यात आली.या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. मा.न्यायालयाच्या आदेशानुसार जैसे थे परिस्थिती पुर्ववत करण्याचे आदेश द्यावेत. शासन निर्णयान्वये अतिक्रमण धारकांचे जागा नियमानुकूल करण्यास किंवा पुनर्वसनासाठी जागा उपलब्ध करण्यास संबंधित अधिकाऱ्यांना आदेश द्यावेत.अशी मागणी काँग्रेसचे मुजफ्फर हुसेन, गोपाल अन्सारी, शेख जियाऊर रहेमान यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

### इंधन दरवाढीच्या निषेधार्थ शिवसेना उबाठाचा मोर्चा

प्रतिक्रीया देतांना व्यक्त केले. भाजपाने निवडणुकांच्या निकालानंतर अचानक इंधन दरवाढ केली. प्रधानमंत्री नरेंद्र परदेशी यांनी परदेश दौरे बंद करावे तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुलेटवर पाहणी करण्याची नौटंकी थांबवावी अशी टिका शिवसेनेचे माजी नगरसेवक नरेंद्र परदेशी यांनी केली. शहरातील मुख्य रस्त्याने शिवसेना उबाठाचे अशोक धात्रक, अतुल सोनवणे, नरेंद्र परदेशी यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते मोर्चात सहभागी झाले.

### व्यावसायिकाला मारहाण अडीच लाख लुटले

आशिष नेहे यांच्याकडील अडीच लाखांची रोकड हिसकावून घेत पसार झाले. धुळे तालुका पोलिसांना याबाबत माहिती देण्यात आली. पोलीस पथकाने परिसरात शोध घेतला, परंतु ते मिळू शकले नाही. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात संशयित सागर संसारी चव्हाण, ईशान उर्फ रांडका दांडया पवार, अनिस, अश्विन(पूर्ण समजु शकले नाही) या चारही संशयीतांविरुद्ध गुन्हा दाखल झाला. धुळे तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक कैलास माळी तपास करीत आहेत.

### सत्कर्म करून पुण्य खात्यात जमा करा

भव सुरू होऊन मनुष्य भव प्राप्त झाले. पैसा, पद, प्रतिष्ठा यांच्यातच मनुष्य आपला वेळ खर्च करत आहे. आपल्याला मनुष्य भव सुधारण्यासाठी मिळाला आहे. गुरु मिळाले आहे. तरी आपले पुण्याचे खाते सुरू झाले आहे किंवा नाही याचे चिंतन होणे गरजेचे आहे. रोज सत्कर्म करून आपण मुदत ठेव केली पाहिजे. पुण्य, पाप आपल्या सोबत जाणार आहे. बुद्धी आपल्याला मिळाली, पण ती सद्बुद्धी आहे का?आपण अनेक प्रकारचे मॅनेजमेंट करतो, पण आत्म्याचे मॅनेजमेंट केले आहे का? आपल्या जवळ संपत्ती असेल तर तिचा उपयोग परिवार,समाज व देशासाठी केला पाहिजे.संपत्ती नसेल, तर जे आहे, त्याचा सदुपयोग केला पाहिजे. मन तर सर्वांजवळ आहे. त्याचा उपयोग इतरांच्या भल्याचा विचार करण्यासाठी केला पाहिजे. त्यानंतर मांगलिक ने समापन झाले.

### पोषण आहाराच्या तांदूळाचा अपहार

शरद नथ्थू पाटील यांनी नंदुरबार शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार अल्हाज काझी चिरागोद्दीन उर्दू प्राथमिक शाळा व अँग्लो उर्दू हायस्कूलचे मुख्याध्यापक फय्याजखान मुसाफ खान रा. बादशाहनगर, नंदुरबार आणि काझी सलाउद्दीन अलीउद्दीन रा. घोडापीर मोहल्ला, नंदुरबार याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक तानाजी बहिरम करीत आहेत.

### बोरगाव येथे घरफोडी दोन ला. ऐवज लंपास

चांदीचे चैन व बिस्किट, दीड लाखांची रोकड असा एकूण दोन लाख १२ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. सोने चांदीच्या दागिन्यांची किंमत आजच्या बाजार भाव चार ते पाच लाखांपेक्षा अधिक आहे. याप्रकरणी शिरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलीस उपनिरीक्षक हेमंत खैरनार तपास करीत आहेत.

## वाडीभोकर रोड परिसरात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबीर उत्साहात

**धुळे, दि.१६- महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार राबविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा क्रमांक अंतर्गत अप्पर तहसीलदार कार्यालय धुळे शहर तसेच महसुल मंडळ अधिकारी कार्यालय देवपूर यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान वाडीभोकर रोडवरील पद्मश्री टॉवर येथे समाधान शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न झाले.**



सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून दिपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती वैशाली हिंगे अपर तहसीलदार धुळे शहर उपस्थित होत्या, अविनाश सोनकांबळे,निवासी नायब तहसीलदार, हंसराज पाटील तहसीलदार धुळे शहर संगांयो, तसेच नगरसेविका वंदना संजय भामरे, सागर कांबळे यांची विशेष उपस्थिती होती सामाजिक कार्यकर्ते अनिल चित्ते, सचिन भदाणे, मोहन खैरनार, मयुर देवरे यांचे सह कार्यालयीन कर्मचारी, दिपक महाले मंडळ अधिकारी देवपूर, किरण कांबळे, पंडित दावडे, कमलेश बाविस्कर, मनोहर पाटील, तसलीम पिंजारी, सुरज भदाणे, प्रतिभा शिंगणे, रितेश रणधीर, विकास सिंगल, श्रीमती कविता चौधरी, कविता पाटील, प्रशांत काकडे, सुनिल सुरशे, सुभाष पाटील, एतेशाम शेख, किशोर बडगुजर, ममता राठोड, ज्योत्सना देसले, ममता ठाकरे, दिनेश दाभाडे, महेश गायकवाड, भूषण चौधरी, राहुल शिरसाट, मनोहर अहिरे, शांतीलाल शिरसाट, नरेंद्र मोरे, नाना गवळी,चंद्रकांत पाटील , किशोर बडगुजर, उदय सूर्यवंशी,गणेश पारधी, सुभाष पाटील यांचे सह सर्व महसूलसेवक व जयेश पवार, रविंद्र चंद्रात्रे, सूर्यकांत जोशी तसेच अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा सेविकामनपा चे वैद्यकीय पथक उपस्थित होते. या शिबिरात विविध प्रकारचे दाखल्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी धुळे शहर, वलवाडी, भोकर, नकाणे, कॉलनी परिसर, नगाव,मोराणे प्र.ल, अवधान, फागणे, मोहाडी प्र.ल. बाळापूर, वरखेडी, चितोड, रावेर, महिंदळे, आणि परिसरातील गावांतील नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभागी झाले.


तहसील कार्यालयामार्फत ३५ नागरिकांना विविध योजनांचे लाभ मंजुरीचे पत्र देण्यात आले तसेच नागरिकांना सातबारातील दुरुस्ती सह विविध सेवेचा लाभ देण्यात आला याबाबत नागरिकांनी समाधान व्यक्त केले. वंदना भामरे यांनी सदर अभियानाबाबत बोलताना या अभियानात नागरिकांनी अधिकाधिक लाभ घेण्याचे आवाहन केले व सर्व महसुली अधिकारी कर्मचारी यांच्या प्रयतकांची प्रशंसा केली. तसेच अध्यक्षीय भाषणात बोलताना वैशाली हिंगे अपर तहसीलदार यांनी एसआयआर मॅपिंग व जनगणनेबाबत सर्व नागरिकांनी सहकार्य करणे बाबत आवाहन केले.

## ट्रेलरने अचानक ब्रेक दाबल्याने पिकअप मागे धडकली; दोन ठार

**नंदुरबार, दि.१७ (प्रतिनिधी)- ट्रेलर वाहनाने गतीरोधकाजवळ ब्रेक दाबल्यामुळे मागून आलेली पिकअप गाडी धडकल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना देवळफळी जवळील उड्डाणपूलावर घडली. याप्रकरणी ट्रेलर वाहन चालकाविरुद्ध नवापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

गुजरात राज्यातील सोनगड तालुक्यातील मेंढा येथील एलसी ठाकूर गामीत (वय ३९), राकेश धर्मा गामीत (वय ३६) हे दोघे पिकअप गाडीने (क्र.जीजे २६/यु-०२७७ राष्ट्रीय महामार्गावरुन जात होते. नवापूर शहराजवळील देवळफळी गावानजीकच्या उड्डाणपूलावर भरधाव वेगातील मोठा ट्रेलर वाहन क्र.एनएल ०१/एएच -७७०४ गतीरोधकावर अचानक ब्रेक दाबला. त्यामुळे मागून येणारी पिकअप गाडी ही ट्रेलर वाहनावर जावून धडकली. या अपघातात पिकअप गाडीतील एलसी ठाकूर गामीत, राकेश धर्मा गामीत हे दोघेही जागीच ठार झाले. याबाबत ठाकूर रोडत्या गामीत यांनी नवापूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार ट्रेलर चालक पुरण दुधनाथ प्रजापती रा.भरकुरवा बाजार, उत्तरप्रदेश याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक अभिजीत अहिरे करीत आहेत.

## उठावणा



अत्यंत दुःख के साथ सुचित करते है की, सुभाषचंदजी, लखीचंदजी इनके भाई तुषार, अनिल के पिताजी, रितेश, धिरज के बाबाजी एवम तेजकरण, प्रकाश, मनसुख, मदनलाल, ललित , सुमतीलाल, संजयकुमार, अनिलकुमार, हरिश, रविंद्र, कल्पेश चोपडा इनके दामाद

**सुश्रावक स्व.दगडूलालजी हिरालालजी बाफना**

(७५) वेल्हाणावाला इनका दि.१६ मे २०२६ शनिवार सुबह ५ बजे दुःखद निधन हुवा है। जिनका **उठावणा** सोमवार दि. १८ मे २०२६ को दोपहार १२:०० बजे जैन स्थानक, ग.नं.२ धुलिया मे होगा।

-: शोकाकुल :-

सुभाषचंद, लखीचंद, तुषार, अनिल, रितेश, धिरज, कुशल, सम्यक बाफना परिवार धुळे एवम समस्त चोपडा परिवार पुणे, संभाजीनगर

**शेतजमीन विकणे**
साक्री रोडटच तीन एकर शेतजमीन विकणे आहे.
-: संपर्क :-
डी.आर. प्रॉपर्टीज
9422289693

**प्लॉट विकणे आहे**
नटराज टॉकीजमागे वाखारकर नगरमध्ये ३१०० चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
डी.आर. प्रॉपर्टीज
9422289693

**जागा विकणे**
मालेगाव रोटटच ४० बाय १०० फुटाची जागा योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
-: संपर्क :-
डी.आर. प्रॉपर्टीज
9422289693

**जागा भाड्याने देणे**
आग्रारोड लगत दोन रोड कॉर्नर जागा भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
डी.आर. प्रॉपर्टीज
9422289693

**पाहिजेत**
दुकानात कामासाठी हुशार व होतकरु मुले/मुली फूलटाईम त्वरीत पाहिजेत.
- समक्ष भेटा -
मुंदडा बुक स्टॉल
पारोळा रोड ग.नं. ६, कॉर्नर, धुळे

**जागा भाड्याने देणे**
हॉस्पिटल तसेच ऑफिससाठी जागा भाड्याने कराराने देणे आहे.
-: संपर्क :-
9423978968
9960486132

**विकणे आहे**
रामचंद्र नगरला लागुन दोन रस्त्यांच्या कॉर्नरचा ४००० स्केअर फुटाचा प्लॉट विकणे आहे.
सुरेश चौधरी
9422286235

**पाहिजेत**
- नर्स (ANM GNM)
- R.M.O
- रिसेप्शनिस्ट
- B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट
संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**ड्रायव्हर पाहिजे**
कार चालविण्यासाठी अनुभवी कायमस्वरुपी निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे.
-: संपर्क :-
9823178279

**वायरमन पाहिजे**
इलेक्ट्रिशियन कामासाठी परमनंट वायरमन पाहिजे.
ग.नं.५, धुळे
-: संपर्क :-
9765373559
9588418856

**पाहिजेत**
FMCG Distributor मध्ये डिलिव्हरीसाठी इंग्रजी वाचता लिहता येणारे डिलिव्हरी बॉय, ड्रायव्हर, सेल्समन पाहिजेत.
पत्ता - अग्रसेन चौकजवळ, धुळे
8767674975

**पाहिजेत**
हॉस्पिटल कामासाठी प्रशिक्षित ब्रदर्स आणि सिस्टर पाहिजेत.
दिवस व रात्रपाळीसाठी
अपुर्वा हॉस्पिटल अँड क्रिटीकल केअर
जमनागिरी रोड, धुळे
डॉ.अनिल रघुवंशी
9823085639
9423978968

**प्लॉट विकणे आहे**
मौजे बाळापूर, फागणे शिवारातील गट नं. (७६) पैकी ३ आर जमीन विकणे आहे.
सूर्यवंशी टाईल्स समोर
-: संपर्क :-
8530140449
7219240449

New Models
ऑफर .... ऑफर .... ऑफर ....
Authorised Dealer
LG Panasonic Godrej



2026 New Model + Upto 30% डिस्काउंट + फ्री वाढीव वॉरंटी + १०% पर्यंत इन्स्टंट डिस्काउंट क्रेडिट कार्डवर*
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.*
आता मिळवा लेटेस्ट AC तेही 0% फायनान्स वर
श्री महावीर इलेक्ट्रीक अ‍ॅण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०